cmyk

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड - महाराष्ट्र | वर्ष-६ | अंक-१३१ | शुक्रवार दि.३१ जुलै २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### नशामुक्ती : भविष्यासाठीचा सामूहिक लढा-मुख्यमंत्री

मुंबई : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या 'नशामुक्त भारत'च्या संकल्पनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी 'ड्रग फ्री मुंबई', 'ड्रग फ्री महाराष्ट्र' आणि 'ड्रग फ्री भारत' घडविण्याचा सामूहिक निर्धार आपण सर्वांनी करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. अमली पदार्थांविरोधातील लढा हा केवळ कायदा-सुव्यवस्थेचा विषय नसून देशाच्या भवितव्याशी संबंधित असल्याने यासाठी सामूहिक प्रयत्न आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते वरळी डोम येथे 'ड्रग फ्री मुंबई' अभियानाचा शुभारंभ झाला. यावेळी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री तथा नशामुक्ती जनजागृती अभियानाच्या उच्चस्तरीय समितीचे अध्यक्ष मंगलप्रभात लोढा, मुंबई महानगरपालिका आयुक्त अश्विनी भिडे, मुंबई पोलिस आयुक्त देवेन भारती, यांच्यासह विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### कुलगुरूंसह शिक्षणतज्ज्ञांचे प्रियांका गांधींना खुले पत्र

दिल्ली: परीक्षा सुधारणा विधेयकावरील चर्चेदरम्यान लोकसभेत काँग्रेस खासदार प्रियंका गांधी यांनी आयआयटी मद्रासचे संचालक प्रा.व्ही. कामकोटी यांच्यावर केलेल्या टिप्पणीवरून वाद चिघळला आहे. या वक्तव्याचा निषेध करत देशभरातील आजी-माजी कुलगुरूंसह तब्बल २१५ हून अधिक शिक्षणतज्ज्ञांनी प्रियंका गांधी-वड्रा यांना उघडे पत्र (ओपन लेटर) लिहिले आहे. लोकशाहीत असहमतीचे स्वागत असले, तरी वैयक्तिक टिप्पणी आणि उपहासामुळे वैज्ञानिक दृष्टिकोन आणि प्रगल्भ सार्वजनिक चर्चेला बाधा पोहोचते, असा आक्षेप या शिक्षणतज्ज्ञांनी नोंदवला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्थापन केलेल्या समितीमध्ये गौमूत्र तज्ज्ञ असल्याचा टोला लगावताना प्रियंका गांधी यांनी आयआयटी मद्रासचे संचालक प्रा. व्ही. कामकोटी यांचा ''गौमूत्र तज्ज्'' असा उल्लेख केला होता. याविरोधात शिक्षणतज्ज्ञ एकवटले आहेत.

### वांगचुक यांच्याकडून केंद्र सरकारच्या भुमिकेचे कौतुक

श्रीनगर: नीट पेपर लीक प्रकरणी केंद्रीय शिक्षण मंत्र्यांचा राजीनामा मागत २६ दिवस उपोषण करणाऱ्या सोनम वांगचुक यांनी आता केंद्र सरकारच्या भूमिकेचे स्वागत केले आहे. दिल्लीतील आंदोलनानंतर जम्मू काश्मीरमध्ये परतलेल्या आणि एक दिवस आराम करून लडाखमध्ये पोहचलेल्या वांचुक यांनी संसदेत पेपर लीक विधेयक पास झाल्यावर आनंद व्यक्त केला. त्यांनी या दिशेने प्रयत्न सुरू राहतील अशी आशा व्यक्त केली. तसेच त्यांना जसे वचन दिले होते तसे आंदोलकांवर कारवाई करू नका अशी मागणी देखील त्यांनी सरकारकडे केली आहे. जंतर मंतर वरील कॉंक्रोज जनता पार्टीच्या आंदोलनाच्या यशामागे सोनम वांगचुक यांची मोठी भूमिका आहे असे मानले जात आहे. १८ जुलै रोजी सोनम वांगचुक यांना ज्या प्रकारे आंदोलन स्थळावरून उचलण्यात आले त्यानंतर जंतर मंतरवरील आंदोलन तीव्र झाले अन् हजारोंच्या संख्येने तरूण रस्त्यावर उतरले.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.२८ जुलै २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ३२.५० क्विंटल | २,६०१ | २,७३६ | २,६६७ |
| ज्वारी/हायब्रिड :३१.०० क्विंटल | २,४७० | २,८०० | २,६४२ |
| मका/लोकल: २०.०० क्विंटल | २,३२३ | २,३२३ | २,३२३ |
| तूर : २.०० क्विंटल | ७,६०१ | ७,६०१ | ७,६०१ |
| उडीद : २.०० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी:५२.०० क्विंटल | २,४०० | २,८४० | २,६५७ |
| मुग: ४१.५० क्विंटल | ५,८०० | ५,८१२ | ५,८०६ |
| सोयाबीन:१.५० क्विंटल | ६,९०० | ६,९०० | ६,९०० |
| हरभरा: १५.५० क्विंटल | ५,००१ | ५,९४० | ५,५०० |

# १० ऑगस्टला कर्जमाफीची दुसरी यादी; १७ लाख शेतकऱ्यांची पहिली यादी तयार

मुंबई । प्रतिनिधी

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत १७ लाख शेतकऱ्यांची पहिली लाभार्थी यादी तयार झाली असून, १० ऑगस्ट रोजी दुसरी यादी जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती राज्याचे सहकारमंत्री बाळासाहेब पाटील यांनी दिली.**



राज्यातील ५६ लाख पात्र शेतकऱ्यांपैकी ३२ लाख शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ, तर २४ लाख शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान दिले जाणार आहे. प्रोत्साहनपर लाभार्थ्यांची स्वतंत्र यादी सप्टेंबरमध्ये प्रसिद्ध करण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. कर्जमाफी योजनेत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडून पीक कर्ज घेतलेल्या २० लाख २१ हजार शेतकऱ्यांचा, तर व्यावसायिक बँकांकडून कर्ज घेतलेल्या सुमारे ६ लाख शेतकऱ्यांचा समावेश आहे. लाभार्थ्यांची पात्रता निश्चित करण्यासाठी संबंधित शेतकऱ्यांचा तपशील आयकर विभागाकडे पडताळणीसाठी पाठविण्यात आला आहे. दरम्यान, व्यावसायिक बँकांकडून कर्ज घेऊन थकीत (एनपीए) खात्यात गेलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी राज्य सरकारने विशेष पुढाकार घेतला आहे. अशा खात्यांवर १५ ते ३५ टक्क्यांपर्यंत सवलत देण्याची विनंती सरकारने बँकांना केली आहे. उदाहरणार्थ, एखाद्या शेतकऱ्याचे एक लाख रुपयांचे कर्ज वर्षभरापासून थकीत असल्यास, त्यातील १५ टक्के रक्कम संबंधित बँकेने माफ करावी,

▶▶ पान २ वर

## पेपरफुटीविरोधातील आंदोलकांवरील गुन्हे अखेर मागे

### ● दिल्ली सरकारचा महत्वपुर्ण निर्णय




दिल्ली । वृत्तसंस्था

परीक्षेतील कथित घोटाळ्याविरोधात झालेल्या आंदोलनातील सहभागींवर दाखल केलेले खटले मागे घेण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय दिल्ली सरकारने घेतला आहे. मात्र, ज्या आंदोलकांची गुन्हेगारी पार्श्वभूमी आहे, त्यांना या निर्णयातून कोणताही दिलासा मिळणार नाही, असे सरकारने स्पष्ट केले आहे. दिल्लीच्या उपराज्यपालांच्या मंजुरीनंतर गृहविभागाने यासंदर्भातील अधिकृत आदेश जारी केले आहेत.

▶▶ पान २ वर

# शिवसेना कोणाची:सुनावणीत ठाकरे गटाचा जोरदार युक्तीवाद

दिल्ली । वृत्तसंस्था

शिवसेना पक्षाचे नाव, 'धनुष्यबाण' हे निवडणूक चिन्ह आणि आमदारांच्या अपात्रतेसंदर्भातील बहुचर्चित प्रकरणावर गुरुवारी सर्वोच्च न्यायालयात महत्त्वपूर्ण सुनावणी झाली. सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठासमोर झालेल्या सुनावणीत ठाकरे गटाच्या वतीने ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी जोरदार युक्तिवाद केला. युक्तिवाद पूर्ण झाल्यानंतर




न्यायालयाने या प्रकरणाची पुढील सुनावणी ४ ऑगस्ट २०२६ रोजी निश्चित केली आहे.

सुनावणीदरम्यान कपिल सिब्बल यांनी स्पष्ट केले की, ते प्रथम आमदारांच्या अपात्रतेच्या मुद्द्यावर आपली बाजू मांडत आहेत. त्यानंतर त्यांनी शिवसेनेचा इतिहास, पक्षाची संघटनात्मक रचना आणि २०२२ मध्ये झालेल्या बंडाचा संपूर्ण घटनाक्रम न्यायालयासमोर मांडला. सिब्बल यांनी न्यायालयाला सांगितले की, १९६६ मध्ये बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसेनेची स्थापना केली. त्यानंतर २०१३ मध्ये उद्धव ठाकरे यांची पक्षप्रमुख म्हणून नियुक्ती झाली. २०१८ मध्ये पक्षांतर्गत निवडणुका नियमांनुसार पार पडल्या असून त्यासंबंधीचे सर्व पुरावे न्यायालयासमोर सादर करण्यात आले आहेत. सिब्बल यांनी युक्तिवादात महत्त्वाचा मुद्दा उपस्थित करत सांगितले की, २०१८ मध्ये एकनाथ शिंदे यांची

▶▶ पान २ वर

## राजकीय संघर्ष बाजूला खा.सोनवणे, धनंजय मुंडे गप्पात रंगले



बीड । प्रतिनिधी

राजकीय वर्तुळाचे लक्ष वेधून घेणारी एक महत्त्वाची बातमी बीडमधून समोर आली आहे. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीनंतर परस्परांपासून दुरावलेले आणि विविध प्रकरणांवरून राजकीय संघर्ष टोकाला गेलेले खासदार बजरंग सोनवणे आणि आमदार धनंजय मुंडे यांनी नुकतीच एका भेटीदरम्यान हस्तांदोलन करत एकमेकांची विचारपूस केली आहे. उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांच्या स्वागतासाठी आणि भेटीसाठी दोघेही शासकीय विश्रामगृहात आले होते, जिथे ही अनपेक्षित भेट घडली.

### सुमित्रा ताई धनंजय मुंडे एकाच वाहनांमधून

जिल्हाधिकारी कार्यालय मध्ये विकास कामाचा आढावा आणि नियोजन समितीच्या बैठकी संदर्भात शासकीय विश्रामगृहावरून पालकमंत्री सुनेत्राताई पवार आणि माजी मंत्री धनंजय मुंडे एकाच वाहना मधून जिल्हाधिकारी कार्यालयात पोहोचले यांच वाहनात गेवराईचे विजयसिंह पंडित देखील होते.

उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री सुनेत्रा पवार सध्या बीड जिल्हा दौऱ्यावर आहेत. त्यांच्या भेटीसाठी व दौऱ्याच्या अनुषंगाने

▶▶ पान २ वर

## वादग्रस्त भोजशाला परिसरात शुक्रवारच्या नमाजसाठी सवोच्च न्यायालयाची परवानगी




दिल्ली । वृत्तसंस्था

मध्य प्रदेशातील धार येथील वादग्रस्त भोजशाला परिसराजवळ असलेल्या दर्ग्याची जागा मुस्लिमांना शुक्रवारी नमाजासाठी उपलब्ध करून देण्याचा महत्त्वपूर्ण आदेश गुरुवारी सर्वोच्च न्यायालयाने दिला. यासोबतच, दर शुक्रवारी दुपारी १ ते ३ या वेळेत या जागेवर मुस्लिमांना नमाज अदा करता येईल, अशी व्यवस्था करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने मध्य प्रदेश सरकारला दिले आहेत.

सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. ''हा आदेश दिला असला तरीही, राज्य सरकार आणि मुस्लिम पक्ष परस्पर संमतीने शुक्रवारी नमाजासाठी इतर दुसऱ्या जागेचा पर्याय शोधू शकतात,'' असे खंडपीठाने स्पष्ट केले. यापूर्वी १४ जुलै रोजी खंडपीठाने या याचिकेचा अंतिम निर्णय होईपर्यंत भोजशालेजवळील मोकळी जागा नमाजासाठी उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले होते. न्यायालयाच्या यापूर्वीच्या आदेशानंतरही मुस्लिम समाजाला

▶▶ पान २ वर

## एफडीआय आयुक्त तुकाराम मुंढे यांच्याविरोधात अंतर्गत नाराजी

### २९ कर्मचाऱ्यांचे गंभीर आरोप, मंत्र्यांकडे लेखी तक्रार

मुंबई । प्रतिनिधी

अन्न भेसळविरोधी मोहिमा आणि धडक कारवायांमुळे राज्यभर चर्चेत असलेले अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांच्यासमोर आता विभागातील अंतर्गत नाराजीचे आव्हान उभे राहिले आहे. छत्रपती संभाजीनगर येथील राज्य अन्न व औषध प्रशासनाच्या प्रयोगशाळेतील २९ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी त्यांच्या



कार्यपद्धतीबाबत गंभीर आक्षेप नोंदवत अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांच्याकडे लेखी निवेदन सादर केले आहे.

सादर करण्यात आलेल्या या निवेदनात प्रयोगशाळेत अचानक दोन शिफ्टमध्ये कामकाज सुरू करण्यात आल्याचा उल्लेख करण्यात आला आहे. मात्र, या निर्णयाची

▶▶ पान २ वर

## मराठवाडा, विदर्भ, उत्तर मध्य महाराष्ट्रातील ६ जिल्ह्यांना मुसळधारेचा इशारा

पुणे । प्रतिनिधी

राज्यात पावसाचा जोर वाढला असून, विविध भागात पावसाच्या सरी हजेरी लावत आहेत. राज्यात सर्वदूर पावसाची शक्यता असून मराठवाडा, विदर्भ आणि उत्तर मध्य महाराष्ट्रासह कोकणात काही ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार पावसाचा इशारा हवामानशास्त्र विभागाने दिला आहे.



मराठवाड्यातील जालना, परभणी, हिंगोली, विदर्भातील यवतमाळ, अमरावती आणि उत्तर मध्य महाराष्ट्रातील जळगाव जिल्ह्यांत काही ठिकाणी मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. तसेच छत्रपती संभाजीनगर, बीड, नांदेड विदर्भातील वाशिम, अकोला, वर्धा, चंद्रपूर उत्तर मध्य महाराष्ट्रातील नाशिक, धुळे आणि नाशिक घाटमाथा, पुणे घाटमाथा, सातारा घाटमाथा आणि कोकणातील रायगड जिल्ह्यांत

▶▶ पान २ वर

# नीट परिक्षेसंदर्भातील चार याचिका औरंगाबाद खंडपीठाने लावल्या फेटाळून

संभाजीनगर । प्रतिनिधी

**मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने नीट (यूजी) उमेदवारांनी दाखल केलेल्या चार रिट याचिका फेटाळून लावल्या, ज्यात त्यांनी त्यांच्या ओएमआर शीटमध्ये फेरफार केल्याचा आरोप केला होता. न्यायालयाने दोन उमेदवारांच्या मूळ ओएमआर शीटची तपासणी करून आणि नॅशनल टेस्टिंग एजन्सीचे (एनटीए) म्हणणे ऐकून, गुणवत्तेच्या आधारावर त्यांच्या याचिका फेटाळल्या. उर्वरित दोन याचिकाकर्त्यांनी त्यांच्या याचिका मागे घेतल्या.**




या चारही उमेदवारांनी यापूर्वी एनटीएकडे असाच दावा केला होता आणि न्यायालयात येण्यापूर्वी प्रस्थापित ओएमआर आव्हान प्रक्रिया/तक्रार निवारणाद्वारे उत्तर मिळवले होते. न्यायालयाने चारही याचिकाकर्त्यांवर प्रत्येकी ५,००० रुपये एनटीएला देण्याचा दंड ठोठावला. या याचिकाकर्त्यांपैकी एक, सोहम गावटे यांनी दावा केला की, त्यांच्या ओएमआर शीट आणि अधिकृत उत्तरपत्रिकेनुसार त्यांना ५२२ गुण मिळायला हवे होते, परंतु त्यांच्या गुणपत्रिकेत केवळ ९५ गुण दाखवले गेले. छत्रपती संभाजीनगरचे रूचा प्रफुल्ल देशपांडे, धुळे जिल्ह्यातील अथर्व जगताप आणि राहुल यांनी असाही आरोप केला होता की, एनटीएने जाहीर केलेले गुण हे त्यांच्या ओएमआर शीटची अधिकृत उत्तरपत्रिकेशी तुलना करून त्यांनी काढलेल्या गुणांशी जुळत नाहीत आणि त्यांनी त्यांच्या मूळ उत्तरपत्रिकांच्या पडताळणीची मागणी केली होती. सुत्रांनी सांगितले की, एनटीएने २० जुलै रोजी एका परिपत्रकाद्वारे ओएमआरमध्ये फेरफार केल्याच्या खोट्या दाव्यांविरुद्ध उमेदवारांना आधीच सावध केले होते. एनटीएने म्हटले होते की, ओएमआर उत्तरपत्रिकांच्या डिजिटल पद्धतीने फेरफार केलेल्या प्रती प्रसारित होत आहेत. एनटीएने २१ जून रोजी नीट (यूजी) परीक्षा घेतली आणि १६ जुलै रोजी निकाल जाहीर केला. एजन्सीने सांगितले की, त्यांनी प्रत्येक नोंदणीकृत उमेदवाराला नोंदणीच्या वेळी दिलेल्या ई-मेल पत्त्यावर त्यांच्या ओएमआर उत्तरपत्रिकेची स्कॅन केलेली प्रत वैयक्तिकरित्या ईमेल केली आहे. निकालानंतर, एनटीएला उमेदवारांकडून अनेक तक्रारी प्राप्त झाल्या, ज्यात असा आरोप करण्यात आला होता की त्यांच्या रोल नंबरवर अपलोड केलेली किंवा त्यांना ईमेल केलेली ओएमआर उत्तरपत्रिका त्यांची

▶▶ पान २ वर

## शिक्षणात मनुस्मृतीचे अनुयायी वाढले-खरगे

दिल्ली । वृतसंस्था



राज्यसभेत पेपरफुटीशी संबंधित परीक्षा सुधारणा विधेयकावरील चर्चेदरम्यान काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या मनुस्मृती वक्तव्यामुळे गदारोळ झाला. ते शैक्षणिक संस्थांमधील आरएसएसच्या हस्तक्षेपाबद्दल बोलत होते. ते म्हणाले की, शैक्षणिक संस्थांमध्ये मनुस्मृतीच्या अनुयायांची संख्या वाढली असून, त्यामुळे शूद्रांना त्यांच्या शिक्षणाच्या हक्कापासून वंचित ठेवले जात आहे. यामुळे सभागृहात गदारोळ झाला. जेपी नड्डा यांनी मध्येच हस्तक्षेप करत म्हटले की, खरगे यांचे वक्तव्य तथ्यहीन असून त्यामुळे अशांतता निर्माण होऊ शकते. यानंतर, सभापती सी. पी. राधाकृष्णन यांनी मनुस्मृती वक्तव्य कामकाजाच्या नोंदीतून वगळण्यात येईल,

▶▶ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# सर्टिफिकेट मंजूर पण प्रकल्प अर्धवट!

आज आपण अशा एका निर्णयाबद्दल बोलणार आहोत, जो केवळ पर्यावरणाशी संबंधित नाही, तर भारतातील विकासाच्या मॉडेलवरच गंभीर प्रश्न उपस्थित करतो. सरकार म्हणते देशात विकास वेगाने सुरू आहे, पण सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट शब्दांत सांगितले आहे की, नियम मोडून विकास करता येत नाही. मग प्रश्न असा निर्माण होतो की, जर प्रकल्पांना पर्यावरणीय मंजुरी आधीच घ्यायची असते, तर अनेक प्रकल्प मंजुरीशिवाय सुरू कसे होतात? आणि जेव्हा न्यायालय अशा प्रकल्पांवर प्रश्न उपस्थित करते, तेव्हा हजारो कोटी रुपयांचा सार्वजनिक पैसा धोक्यात का येतो? आज आपण सर्वोच्च न्यायालयाच्या ऐतिहासिक निर्णयाचा अर्थ समजून घेणार आहोत आणि त्याचबरोबर भारतातील अशा मोठ्या प्रकल्पांचा आढावा घेणार आहोत, ज्यांच्यावर प्रचंड खर्च झाला, पण ते आजही पूर्णत्वास पोहोचलेले नाहीत.

सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारचे २०२१ चे कार्यालयीन पत्रक रद्द केले आहे. या पत्रकामुळे आधी काम सुरू करून नंतर पूर्वलक्षी प्रभावाने पर्यावरणीय मंजुरी घेण्याचा मार्ग खुला झाला होता. न्यायालयाने हा मार्ग बेकायदेशीर ठरवत स्पष्ट केले की पर्यावरण संरक्षण कायदा हा केवळ औपचारिकता नसून विकास प्रक्रियेचा अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. न्यायालयाच्या मते, नियमांचे उल्लंघन करून प्रकल्प सुरू करणे आणि नंतर मंजुरी घेणे म्हणजे कायद्यालाच बगल देणे होय. हा निर्णय केवळ पर्यावरणाच्या संरक्षणासाठी नाही, तर प्रशासनाच्या नियोजनक्षमतेवरही गंभीर प्रश्न उपस्थित करतो.

याच ठिकाणी एक मोठा प्रश्न निर्माण होतो. जर सरकारकडे तज्ज्ञ, अधिकारी, मंत्रालये आणि नियोजनासाठी स्वतंत्र यंत्रणा आहे, तर आवश्यक मंजुरी न घेता प्रकल्प सुरूच कसे होतात? आणि जर नंतर न्यायालयाने अशा प्रकल्पांवर आक्षेप घेतला, तर विलंबामुळे वाढलेला खर्च, नुकसान आणि सार्वजनिक पैशाची जबाबदारी कोण स्वीकारणार? भारतात आज अनेक प्रकल्प असे आहेत ज्यांची घोषणा मोठ्या उत्साहात झाली, भूमिपूजन झाले, निधी मंजूर झाला, पण प्रत्यक्षात ते अनेक वर्षांपासून अपूर्ण आहेत.

यातील सर्वात मोठे उदाहरण म्हणजे मुंबई–अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्प. देशातील हा सर्वात महत्त्वाकांक्षी रेल्वे प्रकल्प मानला जातो. सुरुवातीला त्याची किंमत सुमारे १.०८ लाख कोटी रुपये इतकी निश्चित करण्यात आली होती. मात्र जमीन संपादन, पर्यावरणीय मंजुरी, न्यायालयीन प्रक्रिया आणि प्रशासकीय विलंब यामुळे प्रकल्पाची मूळ अंतिम मुदत ओलांडली गेली. हजारो कोटी रुपयांचा निधी खर्च झाला असूनही संपूर्ण मार्ग अद्याप कार्यान्वित झालेला नाही. यामुळे प्रश्न उपस्थित होतो की, जर नियोजन सुरुवातीपासूनच सर्व बाबी लक्षात घेऊन झाले असते, तर इतका मोठा विलंब टाळता आला नसता का?

दुसरे उदाहरण म्हणजे आंध्र प्रदेशातील पोलावरम सिंचन प्रकल्प. हा राष्ट्रीय महत्त्वाचा प्रकल्प असून सुरुवातीचा खर्च काही हजार कोटी रुपयांमध्ये अपेक्षित होता. मात्र वर्षानुवर्षे खर्च वाढत गेला आणि सुधारित अंदाज ५५ हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक झाला. पुनर्वसन, पर्यावरणीय मंजुरी आणि प्रशासकीय अडचणींमुळे प्रकल्प अजूनही पूर्ण झालेला नाही. दरम्यान निधी वाढत राहिला, पण अपेक्षित लाभ मात्र नागरिकांपर्यंत वेळेत पोहोचला नाही.

याचप्रमाणे केन–बेतवा नदीजोड प्रकल्प हा भारतातील महत्त्वाकांक्षी जलसंपदा प्रकल्प मानला जातो. या प्रकल्पाची किंमत ४४ हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक आहे. मात्र जंगल क्षेत्र, वन्यजीव संरक्षण, पर्यावरणीय मंजुरी आणि विविध कायदेशीर प्रक्रियांमुळे अनेक वर्षे फाईली मंत्रालयांमध्येच अडकून राहिल्या. परिणामी प्रकल्पाची गती मंदावली आणि खर्च वाढत गेला.

सरकारने देशभरातील शंभर शहरांसाठी स्मार्ट सिटी मिशन सुरू केले. हजारो कोटी रुपयांचा निधी या योजनेसाठी मंजूर करण्यात आला. अनेक शहरांमध्ये रस्ते खोदले गेले, डिजिटल सुविधा उभारण्याची घोषणा झाली, स्मार्ट ट्रॅफिक सिस्टीम, ड्रेनेज आणि सार्वजनिक सुविधा विकसित करण्याचे आश्वासन देण्यात आले. पण अनेक शहरांमध्ये आजही अपूर्ण रस्ते, बंद पडलेले डिजिटल प्रकल्प, अपूर्ण ड्रेनेज आणि नागरिकांना अपेक्षित सुविधा न मिळाल्याच्या तक्रारी कायम आहेत. यामुळे केवळ खर्च वाढला नाही, तर नागरिकांचाही विकासावरील विश्वास कमी झाला.

अशीच परिस्थिती नमामी गंगे योजनेबाबतही पाहायला मिळते. गंगा नदी स्वच्छ करण्यासाठी हजारो कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. अनेक सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले. काही ठिकाणी प्रगती झाली असली तरी अनेक प्रकल्प वेळेत पूर्ण झाले नाहीत. परिणामी अनेक भागांमध्ये नदी प्रदूषणाचा प्रश्न आजही कायम आहे. पैसा खर्च झाला, योजना जाहीर झाल्या, पण अपेक्षित परिणाम अनेक ठिकाणी अजूनही दिसत नाहीत.

या सर्व बाबींवर भारताचे नियंत्रक आणि महालेखा परीक्षक, म्हणजेच , वारंवार निरीक्षण नोंदवत आले आहेत. त्यांच्या अहवालांमध्ये चुकीचे नियोजन, खर्चात सातत्याने वाढ, वेळेत काम पूर्ण न होणे, मंजुरी प्रक्रियेतील विलंब आणि जमीन संपादनातील अडथळे ही कारणे पुन्हा पुन्हा अधोरेखित करण्यात आली आहेत. यामुळे सार्वजनिक पैशाचा कार्यक्षम वापर होत नसल्याचेही अनेक अहवालांमध्ये नमूद करण्यात आले आहे. अनेकदा सरकारकडून असा युक्तिवाद केला जातो की पर्यावरणीय मंजुरीमुळे विकासाचा वेग कमी होतो. मात्र सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयातून वेगळाच संदेश समोर येतो. न्यायालय म्हणते, समस्या पर्यावरणीय मंजुरीची नाही, तर नियमांचे पालन न करता प्रकल्प सुरू करण्याच्या पद्धतीची आहे. जर सुरुवातीलाच पर्यावरणीय परिणामांचा अभ्यास, सामाजिक परिणामांचे मूल्यांकन, पुनर्वसनाची तयारी, आवश्यक निधी आणि जमीन संपादनाची प्रक्रिया पूर्ण झाली, तर प्रकल्प अर्धवट राहण्याची शक्यता मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते.

सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे या प्रत्येक अर्धवट प्रकल्पामागे करदात्यांचा पैसा असतो. एखादा पूल असो, महामार्ग असो, सिंचन योजना असो किंवा रेल्वे प्रकल्प प्रत्येक ठिकाणी हजारो कोटी रुपयांची सार्वजनिक गुंतवणूक केली जाते. पण जेव्हा प्रकल्प वेळेत पूर्ण होत नाहीत, तेव्हा खर्च वाढतो, कर्जावरील व्याज वाढते, पुन्हा अतिरिक्त निधी मंजूर करावा लागतो आणि अखेरीस त्याचा आर्थिक भार नागरिकांवरच येतो.

याचा अर्थ असा नाही की विकास प्रकल्प होऊ नयेत. उलट, भारतासारख्या विकसनशील देशाला आधुनिक रेल्वे, महामार्ग, विमानतळ, सिंचन व्यवस्था आणि औद्योगिक पायाभूत सुविधा अत्यंत आवश्यक आहेत. पण विकासाचा अर्थ केवळ भूमिपूजन, घोषणा आणि मोठे आकडे नसतो. योग्य नियोजन, वेळेत मंजुरी, पर्यावरणीय नियमांचे पालन, पारदर्शक खर्च आणि निश्चित कालमर्यादेत पूर्ण होणारे प्रकल्प हाच खऱ्या अर्थाने विकासाचा पाया आहे.

सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय पर्यावरणाच्या संरक्षणापुरता मर्यादित नाही. हा निर्णय सरकारला आणि सर्व अंमलबजावणी यंत्रणांना एक स्पष्ट संदेश देतो की ''नियम मोडून विकास करता येणार नाही.'' विकास महत्त्वाचा आहे, पण तो कायद्याच्या चौकटीत, पारदर्शकतेने आणि जबाबदारीनेच झाला पाहिजे. कारण शेवटी प्रत्येक प्रकल्पामागे सामान्य नागरिकाचा कराचा पैसा असतो. त्यामुळे प्रश्न फक्त पर्यावरणाचा नाही, तर सार्वजनिक पैशाच्या उत्तरदायित्वाचाही आहे.

# नगरबीडपरळी रेल्वे प्रकल्पाला गती द्या

## मराठवाडा मुक्तीदिनी पुढील टप्पा पूर्ण करण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे–उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

बीड । प्रतिनिधी

**नगरबीडपरळी रेल्वे प्रकल्प हे बीड जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाड्याच्या विकासाचे स्वप्न असून, या प्रकल्पामुळे या भागाच्या आर्थिक, औद्योगिक आणि सामाजिक विकासाला मोठी चालना मिळणार आहे. येत्या मराठवाडा मुक्ती दिनापर्यंत (१७ सप्टेंबर २०२६) प्रकल्पाचा पुढील टप्पा पूर्ण करण्यासाठी रेल्वे प्रशासन आणि स्थानिक प्रशासनाने समन्वयाने काम करावे. राज्य शासनाकडून आवश्यक तो निधी उपलब्ध करून दिला जाईल. तसेच स्थानिक अडथळे दूर करण्यासाठी लोकप्रतिनिधींची मदत घेऊन कामांना गती द्यावी, अशा सूचना उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिल्या.**



बीड जिल्हाधिकारी कार्यालयात आज आयोजित नगरबीडपरळी रेल्वे प्रकल्पाच्या आढावा बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी, खासदार बजरंग सोनवणे, आमदार धनंजय मुंडे, आमदार प्रकाश सोळंके, आमदार संदीप क्षिरसागर, आमदार विजयसिंह पंडीत, आमदार विक्रम काळे, पालक सचिव डॉ. राजेश देशमुख, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान, पोलीस अधिक्षक नवनीत कॉंवत उपस्थित होते. उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या की, दिवंगत अजितदादा पवार यांनी मराठवाड्याच्या विकासासाठी विशेष प्रयत्न करून नगरबीड रेल्वे प्रकल्पाला गती दिली. हा प्रकल्प पूर्ण करणे हे त्यांच्या विकासदृष्टीचे स्वप्न असून, ते प्रत्यक्षात आणण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. या रेल्वेमार्गामुळे बीड जिल्ह्याला राज्याच्या मुख्य रेल्वे जाळ्याशी प्रभावीपणे जोडले जाईल आणि उद्योग, व्यापार, शेती, शिक्षण तसेच रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील. त्या पुढे म्हणाल्या की, प्रकल्पाच्या कामात कोणताही अडथळा येऊ देऊ नये. जमीन संपादन, स्थानिक प्रश्न किंवा प्रशासकीय बाबी तातडीने निकाली काढून कामांना गती द्यावी. रेल्वे प्रशासन, जिल्हा प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी परस्पर समन्वयातून प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करावेत.

# नगरपालिकेकडून ऐन पावसाळ्यात रस्त्याचा खेळखंडोबा

## राजीव गांधी चौक परिसरातील वृद्ध–अपंग नागरिकांची हेळसांड

बीड । प्रतिनिधी

**अख्खा उन्हाळा झोपलेल्या नगरपालिकेने ऐन पावसाळ्यात राजीव गांधी चौकात रस्ता खोदून ठेवल्याने या परिसरातील नागरिकासह परिसरातील वृद्ध आणि अपंग व्यक्तींची मोठी हेळसांड झाली. दोन्ही बाजूने रस्ता अडवल्याने नागरिकांनी आपल्या घरी जायचे कसे? हा मोठा प्रश्न निर्माण झाला. अनेकांना आपली वाहने बाहेरच उभी करावी लागलइी. पिण्याच्या पाण्याच्या पाईपलाईनचा प्रश्न निर्माण झाल्याने रस्ता खोदत असल्याचे नगरपालिकेकडून सांगण्यात येत असले तरी अख्खा उन्हाळा झोपलेल्या नगरपालिकेला पावसाळयातच जाग कशी आली? असा प्रश्न नागरिकांना पडला आहे.**



अख्खा उन्हाळा झोपलेला नगरपालिकेने राजीव गांधी चौकातील पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन खराब झाल्याचे कारण दाखवत रस्ताच खोदला. दोन्ही बाजूने पाईप टाकून हा रस्ता बंद केल्याने या परिसरातील राहणारे नागरिक, महिला, वृद्ध, अपंग यांची मोठी अडचण झाली. या परिसरात कोणतेही वाहन जात नसल्याने अपंग व्यक्तीला उचलून घरी न्यावे लागले. तर वृद्ध लोकांनाही उचलून घेण्याची वेळ आली. या परिसरात राहणाऱ्या अनेकांची वाहने बाहेरच चौकात उभी करावी लागली. केवळ पावसाळा आला की च बीड शहरामध्ये रस्ता खोदण्याचे काम सुरू होते. नगरपालिका अख्खा उन्हाळा झोपलेली असते , मात्र पावसाळ्यात नागरिकांना त्रास देण्यासाठी की काय रस्ते खोदण्याचे काम चालू होते. नाल्यांची कामे चालू होतात. आणि यामुळे शहरातील नागरिकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागतो. हा प्रकार गेल्या अनेक दिवसापासून चालू असून ऐरवी नगरपालिकेचे कर्मचारी नेमके काय करतात? असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडला आहे. पाईपलाईन खराब झाली तर त्याची दुरुस्ती वेळेच्या आत का झाली नाही ? असा प्रश्न नागरिकांना पडला आहे. केवळ नागरिकांना त्रास देण्यासाठीच नगरपालीका आहे की काय असाही सवाल या निमित्ताने केला जात आहे. या प्रश्नाकडे वरिष्ठ अधिकारी लक्ष देतील काय? असा नागरिकांचा सवाल आहे.

## पान १ वरून...

### १० ऑगस्टला कर्जमाफीची दुसरी यादी;

तर उर्वरित ८५ टक्के रक्कम शासन अदा करेल, अशी भूमिका सरकारने मांडली आहे. या नव्या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्यातील व्यावसायिक बँकांच्या सुमारे १७ हजार शाखा अधिकारी व व्यवस्थापकांसाठी विशेष प्रशिक्षण व सेमिनार आयोजित करण्यात येत आहेत. याशिवाय, दोन लाख रुपयांपेक्षा जास्त थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांसाठी वन टाइम सेटलमेंट (ओटीएस) योजना १० ऑगस्टपासून सुरू करण्यात येणार असून, मोठ्या कर्जबाजारी शेतकऱ्यांनाही दिलासा मिळणार आहे. कर्जमाफी, ओटीएस आणि प्रोत्साहनपर लाभ या तिन्ही प्रक्रिया टप्प्याटप्प्याने पूर्ण करण्याचे राज्य सरकारचे नियोजन असल्याची माहिती सहकारमंत्री बाळासाहेब पाटील यांनी दिली.

--------------

### शिवसेना कोणाची:सुनावणीत

गटनेतेपदी (गटप्रमुख) नियुक्ती खुद्द पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनीच केली होती. त्यामुळे त्या नियुक्तीची नोंद न्यायालयाने घ्यावी, असे त्यांनी नमूद केले. कपिल सिब्बल यांनी सांगितले की, विधान परिषद निवडणुकीत क्रॉस व्होटिंग झाल्यानंतर पक्षाला संशय आला. त्यानंतर ३१ आमदार अचानक सुरतला गेले आणि नंतर गुवाहाटीत पोहोचले. तेथे आमदारांची संख्या ३९ झाली. या आमदारांनी पक्षाचे प्रतोद सुनील प्रभू यांना हटवण्याचा ठराव केला आणि त्यानंतर राज्यपालांकडे जाऊन सरकार स्थापनेची प्रक्रिया सुरू झाली. सिब्बल यांनी न्यायालयात युक्तिवाद करताना म्हटले की, ''एका पक्षाच्या चिन्हावर निवडून यायचे, त्यानंतर बंडखोरी करून दुसऱ्या गटात जायचे आणि नंतर मूळ पक्षावरच दावा सांगायचा, हा प्रतिनिधिक लोकशाहीवर मोठा घाला आहे.'' 'सुभाष देसाई' प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचा दाखला देत सिब्बल म्हणाले की, राजकीय पक्ष आणि विधिमंडळ पक्ष हे दोन स्वतंत्र घटक आहेत. त्यामुळे केवळ आमदारांचे संख्याबळ असल्यामुळे विधिमंडळ पक्षालाच मूळ राजकीय पक्ष मानता येणार नाही. सिब्बल यांनी निवडणूक आयोगाच्या निर्णयावरही प्रश्न उपस्थित केला. त्यांच्या मते, आयोगाने शिवसेनेची २०१८ मध्ये दुरुस्त करण्यात आलेली पक्षघटना ग्राह्य धरली नाही. त्याऐवजी केवळ विधिमंडळ पक्षाच्या संख्याबळाच्या आधारावर शिंदे गटाला 'शिवसेना' हे नाव आणि 'धनुष्यबाण' हे चिन्ह दिले. सिब्बल यांनी दावा केला की, २०१८ मध्ये दुरुस्त केलेली पक्षघटना निवडणूक आयोगाकडे सादर करण्यात आली होती. मात्र आयोगाने तिचा विचार केला नाही. अपात्रतेच्या मुद्द्यावर ठाकरे गटाचा युक्तिवाद पूर्ण झाल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने दोन्ही पक्षांना आवश्यक कागदपत्रांचे संकलन सादर करण्याचे निर्देश दिले. या महत्त्वाच्या खटल्याची पुढील सुनावणी मंगळवार, ४ ऑगस्ट २०२६ रोजी होणार आहे. जून २०२२ मध्ये एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेतील ४० आमदारांसह बंड पुकारल्यानंतर महाविकास आघाडी सरकार कोसळले. त्यानंतर भाजपच्या पाठिंब्याने शिंदे गटाने सरकार स्थापन केले. या घडामोडीनंतर शिवसेना पक्षाचे नाव आणि 'धनुष्यबाण' हे निवडणूक चिन्ह कोणाला मिळणार, हा वाद केंद्रीय निवडणूक आयोगापुढे गेला. फेब्रुवारी २०२३ मध्ये निवडणूक आयोगाने शिंदे गटालाच 'शिवसेना' हे पक्षनाव आणि 'धनुष्यबाण' हे चिन्ह दिले. तर उद्धव ठाकरे यांच्या गटाला 'शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे)' हे नाव आणि 'मशाल' हे चिन्ह देण्यात आले. यानंतर ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयात विशेष याचिका दाखल करून निवडणूक आयोगाच्या निर्णयाला आव्हान दिले.

------------

### पेपरफुटीविरोधातील आंदोलकांवरील

२० जुलै रोजी कॉकरोच जनता पार्टीतर्फे जंतर-मंतरवरून आयोजित करण्यात आलेल्या चलो संसद मार्च दरम्यान झालेल्या हिंसेप्रकरणी दिल्ली पोलिसांनी एकूण १३ गुन्हे दाखल केले होते. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पोलिसांनी २,८७३ जणांची ओळख पटवली होती, ज्यांच्यावर पोलिसांवर हल्ला करणे आणि वाहनांची तोडफोड केल्याचा आरोप आहे. दिल्ली सरकारच्या गृहविभागाने जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकानुसार, ज्यांच्यावर आधीपासून गंभीर गुन्हे दाखल नाहीत, अशा सामान्य आंदोलक व विद्यार्थ्यांवर कोणतीही दंडात्मक किंवा कायदेशीर कारवाई केली जाणार नाही. ज्यांना ताब्यात घेण्यात आले आहे, त्यांच्या सुटकेची प्रक्रिया वेगाने पूर्ण केली जाईल. परंतु, सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, गुन्हेगारी इतिहास असणाऱ्या व्यक्तींना या संरक्षणाचा लाभ मिळणार नाही. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ओळख पटवलेल्या २,८७३ जणांपैकी ९८९ जण सराईत गुन्हेगार आहेत. त्यांच्यावर हत्या, दरोडा, लैंगिक अत्याचार, अपहरण, आणि अमली पदार्थ विरोधी कायद्यांतर्गत आधीच गंभीर गुन्हे दाखल आहेत. परीक्षा रद्द झाल्यानंतर देशभरात संतापाची लाट पसरली होती. शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची आणि परीक्षा पद्धतीत सुधारणांची मागणी करत हे आंदोलन पेटले होते. केंद्र सरकार आणि आंदोलकांच्या नेत्यांमध्ये झालेल्या चर्चेनंतर तत्कालीन शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा व सुधारणा समितीची स्थापना यांसारख्या मागण्या मान्य करण्यात आल्या होत्या. यापूर्वी बिहार आणि आसाम या एनडीएशासित राज्यांनीही आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याची घोषणा केली आहे. दरम्यान, सीजेपी आणि विद्यार्थी संघटनांनी सर्व आंदोलकांवरील गुन्हे पूर्णपणे मागे घेण्याची आणि अटक केलेल्या सर्व विद्यार्थ्यांची तात्काळ सुटका करण्याची मागणी केली आहे.

-------------

### वादग्रस्त भोजशाला परिसरात शुक्रवारच्या

नमाजासाठी पर्यायी जागा उपलब्ध करून दिली गेली नाही, अशी याचिका हाजी मुनीर अहमद यांच्या वतीने सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. ''धार जिल्हा प्रशासन भोजशाला परिसरापासून सुमारे १.३ किलोमीटर अंतरावर जागा देत आहे, परंतु ही जागा इतकी जवळ असावी जेणेकरून मुस्लिमांना तेथे सहज जाऊन नमाज अदा करता येईल,'' अशी तक्रार मुस्लिम पक्षाने केली होती. सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी नमाजासाठी 'खसरा क्रमांक ५९६' ची जागा मंजूर केली आहे. सुनावणीदरम्यान सादर करण्यात आलेल्या 'साइट प्लॅन'चा संदर्भ देत न्यायालयाने सांगितले की, ''संबंधित जमिनीपर्यंत जाण्यासाठी स्वतंत्र मार्ग उपलब्ध आहे, त्यामुळे हे ठिकाण योग्य वाटते.'' तसेच ही जागा वादग्रस्त भोजशाला परिसराच्या अगदी लगत असल्याचेही न्यायालयाने नमूद केले. दरम्यान, १५ मे रोजी मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने भोजशाला–कमाल मौला मशीद प्रकरणात ऐतिहासिक निर्णय देताना हा संपूर्ण परिसर देवी सरस्वतीला समर्पित 'वाग्देवी मंदिर' असल्याचे घोषित केले होते. यासोबतच उच्च न्यायालयाने भारतीय पुरातत्व विभागाचा जुना आदेश रद्द केला होता, ज्याद्वारे मुस्लिमांना दर शुक्रवारी भोजशाला परिसर नमाजासाठी वापरण्याची परवानगी देण्यात आली होती. तसेच केंद्र सरकार आणि एएसआयने भोजशाला परिसराच्या व्यवस्थापन आणि प्रशासनाबाबत योग्य तो निर्णय घ्यावा, असे आदेशही उच्च न्यायालयाने दिले होते.

------------

### राजकीय संघर्ष बाजूला खा.सोनवणे,

खासदार बजरंग सोनवणे आणि आमदार धनंजय मुंडे हे दोघेही बीडच्या शासकीय विश्रामगृहात उपस्थित होते. यावेळी दोघा नेत्यांची समोरासमोर भेट झाली. मागील काही काळापासून विलास घुले हत्या प्रकरण आणि मसाजोग (तालुका केज) येथील संतोष देशमुख हत्या प्रकरणानंतर जुने मित्र असलेले हे दोन्ही नेते एकमेकांविरोधात आक्रमक भूमिका घेताना दिसले होते. या गंभीर घटनांमुळे दोघांच्यातील राजकीय संघर्ष सर्वश्रुत झाला होता आणि त्यांच्यात विसंवाद असल्याचे बोलले जात होते.हस्तांदोलनाने वेधले सर्वांचे लक्षमात्र, विश्रामगृहातील या भेटीत सर्व राजकीय कटुता विसरून खासदार बजरंग सोनवणे आणि आमदार धनंजय मुंडे यांनी हसतमुखाने एकमेकांच्या हातात हात दिला आणि आस्थेने विचारपूस केली. काही काळापूर्वी जिल्हाधिकारी कार्यालयात जाण्याच्या मुद्द्यावरून किंवा अन्य प्रकरणांवरून दुरावलेले हे दोन नेते अशा प्रकारे मनमोकळ्या वातावरणात भेटल्याने उपस्थित कार्यकर्त्यांच्या आणि राजकीय वर्तुळाच्या भुवया उंचावल्या आहेत. कधीकाळी अत्यंत जवळचे मित्र मानले जाणारे हे नेते अलीकडच्या काळात राजकीय संघर्षांमुळे एकमेकांपासून दुष्टिक्षेपात होते. त्यामुळे शासकीय विश्रामगृहातील या छोट्याशा भेटीची आणि त्यांच्या हस्तांदोलनाची चर्चा आता संपूर्ण बीड जिल्ह्यात चांगलीच रंगली असून, यामागील राजकीय समीकरणे काय याची अटकळ बांधली जात आहे.

-------------

### मराठवाडा, विदर्भ, उत्तर मध्य महाराष्ट्रातील ६

काही ठिकाणी मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. धाराशिव, लातूर विदर्भातील बुलढाणा, नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोलीसह मध्य महाराष्ट्रात अहिल्यानगर, पुणे, सोलापूर, सातारा, कोकणातील सिंधुदुर्ग, रत्नागिरी, ठाणे, मुंबई, पालघर आणि उत्तर मध्य महाराष्ट्रातील नंदुरबार जिल्ह्यांत विजांसह वादळी पावसाची शक्यता असल्याने येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर उर्वरित राज्यात हलक्या सरी हजेरी लावण्याचा अंदाज हवामानशास्त्र विभागाने वर्तवला आहे. पुणे घाटमाथा आणि नाशिक घाटमाथ्यावर काही ठिकाणी मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा रेड अलर्ट देण्यात आला आहे. कोकणातील ठाणे, पालघर, रायगड आणि सातारा घाटमाथ्यासह उत्तर मध्य महाराष्ट्रातील नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार जिल्ह्यांत काही ठिकाणी जोरदार पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर मुंबई, रत्नागिरी, सिंधुदुर्ग,कोल्हापूर, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, बीड, जालना, बुलढाणा, वाशिम, यवतमाळ, अकोला, अमरावती, वर्धा जिल्ह्यांत विजांसह वादळी पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला असून परभणी, हिंगोली आणि नांदेड जिल्ह्यांत हलक्या सरी हजेरी लावण्याचा अंदाज आहे. तसेच उर्वरित राज्यात ऊन सावल्यांच्या खेळात हलक्या सरींचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

------------

### एफडीआय आयुक्त तुकाराम मुंढे

अंमलबजावणी करताना आवश्यक कर्मचारी, तांत्रिक सुविधा, आधुनिक उपकरणे आणि इतर संसाधने उपलब्ध करून देण्यात आली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. परिणामी, विद्यमान अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर कामाचा अतिरिक्त ताण पडत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. कर्मचाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, प्रयोगशाळेतील कामकाजाची वेळ मोठ्या प्रमाणात वाढली असून अनेकांना सकाळी ९ वाजल्यापासून रात्री उशिरापर्यंत, काही वेळा मध्यरात्रीपर्यंत काम करावे लागत आहे. एवढेच नव्हे तर शनिवार, रविवार आणि सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही काम करण्याचे आदेश दिल्यामुळे कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक आयुष्यावर आणि काम–जीवन समतोलावर प्रतिकूल परिणाम होत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली आहे. निवेदनात प्रयोगशाळेतील तपासणी प्रक्रियेबाबतही चिंता व्यक्त करण्यात आली आहे. अन्नपदार्थ, औषधे आणि सौंदर्यप्रसाधनांचे प्रलंबित नमुने लवकर निकाली काढण्यासाठी विश्लेषकांवर अतिरिक्त दबाव टाकला जात असल्याचा आरोप कर्मचाऱ्यांनी केला आहे. भारतीय औषध संहिता, ब्रिटिश फार्माकोपिया आणि युनायटेड स्टेट्स फार्माकोपिया यांसारख्या मान्यताप्राप्त मानकांनुसार नमुन्यांचे विश्लेषण करण्यासाठी पुरेसा कालावधी आवश्यक असतो. मात्र, अल्पावधीत अहवाल पूर्ण करण्याच्या दबावामुळे तपासणीच्या गुणवत्तेवर परिणाम होण्याची शक्यता असल्याची भीतीही निवेदनात व्यक्त करण्यात आली आहे. प्रयोगशाळेतील कर्मचाऱ्यांनी वाढीव कामकाजाच्या तुलनेत आवश्यक मनुष्यबळ, आधुनिक उपकरणे, तांत्रिक सहाय्यक आणि इतर मूलभूत सुविधा उपलब्ध नसल्याचे नमूद केले आहे. अशा परिस्थितीत दोन शिफ्टमध्ये काम सुरू केल्याने विद्यमान कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त जबाबदारी पडत असल्याचा दावा करण्यात आला आहे. या निवेदनावर प्रयोगशाळेतील सहसंचालकांसह एकूण २९ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. त्यांनी प्रशासनाकडे काही महत्त्वाच्या मागण्याही मांडल्या आहेत. या तक्रारीमुळे अन्न व औषध प्रशासन विभागातील कामकाज आणि व्यवस्थापनाबाबत नवा वाद निर्माण झाला आहे. मात्र, या निवेदनावर अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ किंवा विभागाकडून अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही. सरकार या तक्रारीची दखल घेऊन काय भूमिका घेते आणि कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत कोणता निर्णय घेतला जातो, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

-----------

### शिक्षणात मनुस्मृतीचे

अशी घोषणा केली. हा संपूर्ण वाद पेपरफुटीशी संबंधित सार्वजनिक परीक्षा सुधारणा विधेयकावरील चर्चेदरम्यान झाला. यापूर्वी, केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांनी राज्यसभेत पेपरफुटी विधेयक सादर केले होते. पेपरफुटीशी संबंधित हे विधेयक लोकसभेत सुमारे सात तासांच्या चर्चेनंतर मंजूर करण्यात आले होते. यावेळी खरगे यांनी विद्यार्थी आंदोलन आणि जनतेच्या दबावापुढे सरकारला झुकावे लागले. धर्मेंद्र प्रधान यांना हटवणे आणि दुरुस्ती विधेयक आणणे हे विद्यार्थ्यांच्या हिताचे नव्हते, तर सरकारचे स्थान वाचवण्यासाठी आलेली एक सक्ती होती. दंड १ कोटी रुपयांवरून १० कोटी रुपयांपर्यंत वाढवणे, शिक्षा वाढवणे, आणि विशेष कृती दल व जलदगती न्यायालये स्थापन करणे पुरेसे नाही. खरी गरज परीक्षा प्रणाली पारदर्शक करण्याची आहे. शांततेने आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज, अश्रुधूर आणि पेलेट गनचा वापर करण्यात आला. जर गृहमंत्री अमित शाह याचे उत्तर देऊ शकत नसतील, तर त्यांनी राजीनामा द्यावा. नवीन अभ्यासक्रमात असे संदर्भ जोडले जात आहेत, ज्यात वेद ऐकणाऱ्या किंवा बोलणाऱ्या शूद्रांना कठोर शिक्षेचा उल्लेख आहे. ते म्हणाले की, अशी विचारसरणी असलेल्यांना शिक्षण व्यवस्थेतून वगळले पाहिजे. या वक्तव्यामुळे सत्ताधारी पक्षात मोठा गदारोळ झाला. मल्लिकार्जुन खरगे म्हणाले, ''केवळ काही वर्षांत १५२ परीक्षांचे पेपर फुटले आहेत, पण एकालाही शिक्षा झालेली नाही. सरकार काय करत होते? तपास यंत्रणा झोपल्या होत्या का? शिक्षण हा काही मोजक्या लोकांचा विशेषाधिकार नाही. आरएसएसने शैक्षणिक संस्था ताब्यात घेतल्या आहेत. शिक्षणासाठी अर्थसंकल्पात सहा टक्के तरतूद असायला हवी, पण ती तीन टक्क्यांपेक्षा कमी आहे.''

----------

### नीट परिक्षेसंदर्भातील चार याचिका औरंगाबाद

नव्हती, किंवा ती 'बदलण्यात' आली होती, किंवा उमेदवाराने केलेल्या दाव्यापेक्षा त्यात खूपच कमी उत्तरे होती. मूल्यांकनातील त्रुटी नाकारताना, परीक्षा संस्थेने असे आढळले की त्यांनी सोबत जोडलेल्या प्रतिमा संस्थेने जारी केलेल्या ओएमआर उत्तरपत्रिकेच्या नव्हत्या.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शुक्रवार, दि. ३१ जुलै २०२६



## थोडक्यात

### लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त पाटोद्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन

पाटोदा । प्रतिनिधी

लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती उत्सव समिती, पाटोदा यांच्या वतीने लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त दि. ३१ जुलै व १ ऑगस्ट २०२६ रोजी विविध सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.




दि. ३१ जुलै (शुक्रवार) रोजी सकाळी ११ वाजता रांगोळी स्पर्धा, दुपारी १२ वाजता निबंध स्पर्धा, दुपारी १ वाजता चित्रकला स्पर्धा, सायंकाळी ६ वाजता भाषण स्पर्धा व सायंकाळी ७ वाजता संगीत खुर्ची स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. हे सर्व कार्यक्रम सभागृहासमोर, साठे नगर, पाटोदा येथे होणार आहेत.

दि. १ ऑगस्ट (शनिवार) रोजी सकाळी १० वाजता आमदार सुरेश (आण्णा) धस यांच्या हस्ते ध्वजारोहण, सकाळी १०.३० वाजता लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन, सकाळी ११ वाजता भव्य रक्तदान शिबिर आणि सायंकाळी ५ वाजता भव्य मिरवणूक सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या दिवसाचे कार्यक्रम लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक, पाटोदा येथे संपन्न होणार आहेत. लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती उत्सव समिती, पाटोदा यांच्या वतीने सर्व नागरिक, युवक-युवती, विद्यार्थी, सामाजिक कार्यकर्ते व अण्णाभाऊ साठे प्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी करावा, तसेच रक्तदान शिबिरात सहभागी होऊन समाजसेवेचा संदेश द्यावा, असे आवाहन समितीचे मार्गदर्शक सभापती किशोर अडागळे यांनी केले आहे.

### विनयभंग व मारहाणीच्या गुन्ह्यात मुख्य आरोपीस अटकपूर्व जामीन मंजूर

बीड । प्रतिनिधी

तलवाडा पोलीस ठाण्यात विनयभंग, बेकायदेशीरपणे घरात घुसून मारहाण करणे, गळ्यातील दागिने आणि रोख रक्कम बळजबरीने





काढून घेतल्याचा गंभीर गुन्हा दाखल असलेल्या मुख्य आरोपीला न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. या प्रकरणातील आरोपीन दाखल केलेला अटकपूर्व जामीन अर्ज न्यायालयाकडून मंजूर करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, तलवाडा पोलीस स्टेशन अंतर्गत काही दिवसांपूर्वी फिर्यादीच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला होता. आरोपीनी घरात बेकायदेशीरपणे प्रवेश करून मारहाण केली, तसेच घरात घुसून गळ्यातील दागिने बळजबरीने हिसकावून घेतले आणि पैसे काढून घेतले. यासोबतच विनयभंग व दमदाटी केल्याप्रकरणी विविध गंभीर कलमांखाली हा गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल झाल्याने अटकेची शक्यता गृहीत धरून आरोपीनी अटकपूर्व जामिनासाठी न्यायालयात धाव घेतली होती.

बचाव पक्षाचा न्यायालयात

सदर जामीन अर्जावरील सुनावणी दरम्यान आरोपींच्या वतीने ज्येष्ठ विधिज्ञ ड. अशोक मुंडे यांनी बाजू मांडली. या खटल्यात ड. मुंडे यांना ड. तुषार विधाते आणि ड. आदर्श जाधव यांनी कायदेशीर सहकार्य केले.

न्यायालयाचा निर्णय

दोन्ही बाजूंचा युक्तिवाद आणि प्रकरणाची पार्श्वभूमी विचारात घेऊन न्यायालयाने बचाव पक्षाचा युक्तिवाद ग्राह्य धरला. न्यायालयाने आरोपीचा अटकपूर्व जामीन मंजूर केला. न्यायालयाच्या या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे आरोपीस मोठा दिलासा मिळाला आहे.

# माजलगाव-तेलगाव रस्त्याच्या दुरुस्तीसाठी प्रितमताई मुंडे यांनी घेतली नितीन गडकरी यांची भेट

## पालखी मार्गाची दुर्दशा मिटणार, गडकरींचा सकारात्मक प्रतिसाद

दिल्ली । वृत्तसेवा

जिल्ह्याच्या माजी खासदार डॉ. प्रितमताई मुंडे यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग विकास मंत्री नितीन गडकरी यांची त्यांच्या दिल्लीस्तीत निवासस्थानी भेट घेतली. जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग ५४८ सी या रस्त्याच्या दुरावस्थेबाबत त्यांनी गडकरी यांना निवेदन सादर करत सदरील रस्त्याच्या दुरुस्तीची मागणी केली.

बीड जिल्ह्यातून जाणाऱ्या शेगाव-पंढरपूर पालखी महामार्गाची माजलगाव ते तेलगाव दरम्यान अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. ठिकठिकाणी रस्त्याला पडलेल्या भेगांमुळे या मार्गावर अपघाताच्या शक्यता निर्माण झाल्या आहेत. माजी खासदार डॉ. प्रितमताई मुंडे यांनी ही गंभीर बाब नितीन गडकरी यांच्या निदर्शनास आणून दिली. प्रवासी आणि स्थानिक नागरिकांना याचा प्रचंड त्रास सहन करावा लागतो आहे, वाहतूक व्यवस्था आणि नागरिकांच्या सोयीसाठी सदरील रस्त्याची दुरुस्ती करणे अत्यंत आवश्यक असल्याचे यावेळी त्यांनी नमूद केले.



राज्यातील दोन महत्वाच्या तीर्थक्षेत्रांना जोडणारा हा रस्ता असल्यामुळे आपणही याबाबतीत सकारात्मक असल्याचे सांगत नितीन गडकरी यांनी दुरुस्तीसंदर्भात कार्यवाही करण्याच्या सूचना संबंधिताना दिल्या आहेत. नितीन गडकरी यांनी दखल घेऊन दिलेल्या सकारात्मक प्रतिसादामुळे लवकरच या रस्त्याची दुर्दशा संपणार असून लवकरच रस्त्याच्या दुरुस्तीसाठी कार्यवाही होणार असल्याचा विश्वास डॉ. प्रितमताई मुंडे यांनी व्यक्त केला.

स्थानिक यंत्रणेच्या उदासीनतेमुळे डॉ. प्रितमताई मुंडे थेट गडकरींना भेटल्या

पालखी महामार्गातील माजलगाव ते तेलगाव दरम्यानच्या रस्त्याला भेगा पडत असल्याची बाब निदर्शनास आल्यापासून डॉ. प्रितमताई मुंडे यांनी वेळोवेळी याविषयी स्थानिक यंत्रणेशी संपर्क केला. २०२३ पासून त्यांनी रस्त्याच्या दुरावस्थेकडे यंत्रनेचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. परंतु राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, बांधकाम विभाग, राज्य रस्ते विकास महामंडळाच्या वरिष्ठानी याकडे सपशेल दुर्लक्ष केले. वारंवार पत्र व्यवहार करून देखील रस्त्याच्या दुरुस्तीसाठी स्थानिक पातळीवरून हालचाली होत नसल्याचे बघून डॉ. प्रितमताई मुंडे यांनी थेट दिल्ली गाठली आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे रस्त्याच्या दुरावस्थेचा विषय मांडला. त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांची नितीन गडकरी यांनी दखल घेतली असून रस्त्याचा प्रश्न मार्गी लावण्याची ग्वाही दिली आहे.

# तलाव भूसंपादन घोटाळा प्रकरणी तत्कालीन उपजिल्हाधिकारी सुर्यवंशी, अव्वल कारकून श्रीनिवास मुळे, यांच्यावर कारवाईची टांगती तलवार!

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा...मेंगडेवाडी (ता. पाटोदा) येथील तलाव भूसंपादन प्रकरणातील आर्थिक गैरव्यवहारामुळे तत्कालीन उपजिल्हाधिकारी चंद्रकांत सुर्यवंशी, अव्वल कारकून श्रीनिवास मुळे तसेच संबंधित अधिकारी, कर्मचारी आणि वकील यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. बनावट कागदपत्रे, खोटे अहवाल व बनावट सही-शिक्क्यांच्या आधारे शासनाची दिशाभूल करून १ कोटी ४६ लाख ३५ हजार ७७७ इतक्या रकमेचा अपहार करण्यात आला असून, संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ





महाराष्ट्र राज्य डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.

या प्रकरणी प्रशासनाने कारवाई टाळल्याने शेतकरी बाबासाहेब रावसाहेब मेंगडे यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठात रिट याचिका क्रमांक १८०४/२०२६ दाखल केली होती. न्यायालयाच्या निर्देशानंतर भूसंपादन प्रशासनाने सखोल चौकशी करून २९ मे २०२६ रोजी आपला अहवाल बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्याकडे सादर केला आहे. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाईची शक्यता निर्माण झाली असून महसूल विभागात खळबळ उडाली आहे.

मेंगडेवाडी तलाव भूसंपादनातील कथित गैरव्यवहार

पाटोदा तालुक्यातील मौजे मेंगडेवाडी येथील गट क्रमांक १०० मधील बाबासाहेब मेंगडे यांची सुमारे दीड एकर जमीन गाव तलाव क्रमांक ५ (लमाणतळ) प्रकल्पासाठी संपादित करण्यात आली होती. नियमानुसार प्रत्यक्ष संयुक्त मोजणी होणे आवश्यक असताना ती न करताच कार्यालयात बसून बनावट मोजणी अहवाल तयार करण्यात आला. त्यानंतर खोट्या सही-शिक्क्यांच्या आधारे अंतिम निवाडा करून शासनाची १.४६ कोटींहून अधिक रक्कम परस्पर हडप करण्यात आली. या प्रकरणी डॉ. गणेश ढवळे यांनी मेंगडे कुटुंबीयांची प्रत्यक्ष भेट घेऊन तलावाची स्थळ पाहणी करून कागदपत्रांची पडताळणी करून त्यांच्यासमवेत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले होते. तसेच दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करून संपूर्ण रक्कम व्याजासह वसूल करण्याची मागणीही त्यांनी केली होती.

## पान ६ वरुन...

पान ६ वरुन...

### घरफोडी करणारा आरोपी

ता. केज, जि. बीड) याने केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानुसार, पोलिसांनी आरोपीस त्याच्या फुलेनगर भागातील राहत्या घरातून ताब्यात घेतले. पोलिसी खाक्या दाखवताच त्याने गुन्हा केल्याची कबुली दिली. तसेच चोरी केलेली रोख रक्कम व दागीने घरातच लपवून ठेवल्याचे सांगितले. दोन पंचासमक्ष आरोपीकडून २,७०,००० रुपये रोख व ७४,००० रुपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने, असा एकूण ३,४४,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीस पुढील कायदेशीर कारवाईसाठी केज पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही उल्लेखनीय कामगिरी पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक (अंबेजोगाई) श्रीमती चेतना तिडके व सहायक पोलीस अधीक्षक श्री. व्यंकटराम यांच्या मार्गदर्शनाखाली, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी बंटेवाड, पोउपनि महेश विघ्ने, पोहवा बप्पासाहेब घोडके, दिलीप गित्ते, महेश जोगदंड, जफर पठाण आणि चालक गणेश मराडे यांच्या पथकाने पार पाडली आहे.

### राक्षसभुवन वाळू घोटाळा

अहवालात त्यांच्यावर ठपका ठेवण्यात आला आहे त्याच आधारे त्यान्च्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा त

यापुढे समितीने अत्यंत गंभीर आरोप करत म्हटले आहे की, संपूर्ण तपास भरकटवून मूळ सूत्रधारांना वाचविण्याचा प्रयत्न सुरू आहे. इंदापूरच्या राजकीय संरक्षणामुळे संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई टाळली जात असून, तपास यंत्रणांवरही दबाव असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. अशा परिस्थितीत सामान्य नागरिकांचा कायद्यावरील विश्वास डळमळीत होत असून, प्रशासनाने निष्पक्षतेची भूमिका घ्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

निवेदनात गेवराई तालुक्यात विनानंबर हायवा व ट्रकद्वारे ओव्हरलोड वाळू वाहतूक सर्रास सुरू असल्याचाही आरोप करण्यात आला आहे. टोल नाक्यांवरून अशी वाहने कोणत्याही अडथळ्याविना ये-जा करत आहेत. यासाठी जिल्हा ट्राफिक व शहर ट्राफिकयांना हप्ते देऊन हा सर्व प्रकार राजरोस सुरु आहे. त्यामुळे संबंधित यंत्रणांच्या दुर्लक्षामुळे हा प्रकार सुरू असल्याचा आरोप समितीने केला आहे. याबाबत जीपीएस माहिती, कॅमेऱ्यातील छायाचित्रे व इतर पुरावे देण्याची तयारीही समितीने दर्शविली असून, त्याआधारे संबंधितांवर पोलिसावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या संपूर्ण प्रकरणात पोलीस अधीक्षकांनी स्वतः लक्ष घालून आर्थिक गुन्हे शाखेमार्फत निष्पक्ष, पारदर्शक आणि वेगवान तपास करण्याचे आदेश द्यावेत, तसेच कोणताही राजकीय किंवा प्रशासकीय दबाव न स्वीकारता दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी गोदावरी बचाव सर्वपक्षीय कृती समितीचे राजेंद्र मोटे, अजय दाभाडे, महेश बेदरे, अजय गायकवाड, उद्धव खाडे राहुल चाळक धममपाल कांडेकर अमोल सुतार, ऍड नारायण शिंदे ,, आणि मुक्ताराम मोटे आदींनी पोलीस अधीक्षकांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

### गोर गरीब जनतेसाठी येणारे

अधिकारी, पुरवठा विभाग व ठेकेदार यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी व लाभार्थ्यांना दर्जेदार धन्य देण्यात यावे अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया सचिन खरात गटाचे बीड जिल्हा सरचिटणीस नईम करीम आतार हे लवकरच जिल्हा पुरवठा अधिकारी व विभागीय आयुक्त यांची भेट घेऊन रेशन दुकानावर मिळणारे धान्य पुरवठा अधिकारी व विभागीय आयुक्तांना देणार असल्याचे आमच्या प्रतिनदेशी बोलताना त्यांनी सांगितले आहे.

### भारतीय ज्ञानपरंपरेचे मूल्य

प्रास्ताविक संयोजक डॉ.सचिन कंदले यांनी केले. सूत्रसंचलन डॉ.रुपाली कुलकर्णी यांनी केले. आभार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर यांनी मानले. यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य, सभा सदस्य, अभ्यास मंडळाचे सदस्य तसेच ४७५ हून अधिक प्राध्यापक, विद्यार्थी आणि संशोधक उपस्थित होते.

नवीन शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी-डॉ.योगेश क्षीरसागर

डॉ.योगेश क्षीरसागर यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, भारतीय ज्ञानपरंपरेमुळे भारताला प्राचीन काळापासून अभ्यास, संशोधन आणि संस्कारशील शिक्षणाची समृद्ध परंपरा लाभली आहे. विविध विद्यापीठांमधून ही परंपरा दीर्घकाळ जोपासली गेली. परंपरागत शिक्षण, शेती, योग, आयुर्वेद आणि वैद्यकशास्त्र यांचा समन्वय साधत नवीन शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी होत आहे. त्याचा आगामी पिढीला मोठा लाभ होईल.

विद्यार्थी आणि विद्यापीठाच्या हितासाठी विद्यापीठ विकास मंच : परमेश्वर हसबे

विद्यापीठ विकास मंचाचे सचिव परमेश्वर हसबे म्हणाले की, विद्यार्थी आणि विद्यापीठाच्या हितासाठी विद्यापीठ विकास मंच सातत्याने कार्यरत असून विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून भारतीय शैक्षणिक कार्य पुढे नेले जात आहे. मातृभाषेतून शिक्षण देण्याच्या दिशेने वाटचाल सुरू असून भारतीय मूल्यशिक्षणाची घसरण होऊ न देता युवकांच्या मनात चांगले विचार विकसित करण्याची गरज आहे.

भारतीय गुरु-शिष्य परंपरा जगामध्ये श्रेष्ठ : संजय स्वामी

शिक्षा संस्कृती उत्थान न्यासचे राष्ट्रीय उपाध्यक्ष संजय स्वामी यांनी बीजभाषणात सांगितले की, भारतीय गुरु-शिष्य परंपरा जगामध्ये श्रेष्ठ असून समाजात परिवर्तन घडविणारा युवा भारत घडविणे ही काळाची गरज आहे. प्राचीन काळापासून भारतीय शिक्षणपरंपरा श्रेष्ठ राहिली आहे. शिक्षणातून जीवन जगण्याची कला आत्मसात झाली पाहिजे. शिक्षक निष्क्रिय राहिला तर येणारी पिढी भरकटते. त्यामुळे शिक्षकांनी नेहमी सक्रिय राहून उद्याचा सक्षम युवा भारत घडविण्यासाठी योगदान द्यावे.

गुरुपौर्णिमेनिमित्त शिक्षणतज्ज्ञांचा गौरव

शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञांचा गुरुपौर्णिमेनिमित्त मान्यवरांच्या हस्ते स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. यामध्ये डॉ.दीपाताई क्षीरसागर, डॉ.मुनीष शर्मा, डॉ.अशोक मोहेकर, डॉ.चंद्रशेखर राव, डॉ.वसंत सानप आणि विनायकराव पाटील यांचा सन्मान करण्यात आला.

# भर पावसाळ्यातही आष्टी शहरात पाणीटंचाई तीव्र; नगरपंचायतीकडून १५ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू

आष्टी । प्रतिनिधी

भर पावसाळ्याचा हंगाम सुरू असतानाही आष्टी शहरासह परिसरावर भीषण पाणीटंचाईचे संकट ओढवले आहे. जुलै महिना संपत आला तरी समाधानकारक पाऊस न झाल्याने तलाव, विहिरी आणि इतर जलस्रोतांमध्ये अपेक्षित पाणीसाठा निर्माण झालेला नाही. परिणामी आष्टी नगरपंचायतीला शहरवासीयांची तहान भागविण्यासाठी तब्बल १५ टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याची वेळ आली आहे.

सामान्यतः पावसाळ्यात जलस्रोत भरून निघतात आणि टँकरची गरज भासत नाही. मात्र यंदा पावसाने पाठ फिरवल्याने आष्टीकरांना उन्हाळ्याप्रमाणेच पाण्यासाठी झगडावे लागत आहे. केवळ रिमझिम स्वरूपाचा पाऊस होत असल्याने शेतीसह पिण्याच्या पाण्याचाही गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. शेतकऱ्यांच्या पिकांवर अनिश्चिततेचे सावट असून नागरिकांनाही पाण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे.

आष्टी नगरपंचायतीचे मुख्याधिकारी बाळदंत मोरे यांनी सांगितले की, प्रत्येकी २० हजार लिटर क्षमतेच्या १५ टँकरद्वारे शहरात पाणीपुरवठा सुरू आहे. आष्टी तालुक्यातील सर्वात मोठ्या मेहेकरी पाणीपुरवठा प्रकल्पातून पाणी आणून नागरिकांना वितरित केले जात आहे. पुढील काही दिवसांतही समाधानकारक पाऊस झाला नाही, तर शहराची गरज लक्षात घेऊन टँकरची संख्या वाढवावी लागू शकते.

शहरातील अनेक भागांमध्ये नळाद्वारे नियमित पाणीपुरवठा होत नसल्याने नागरिकांचा टँकरवरच मोठ्या प्रमाणात आधार आहे. वाढती लोकसंख्या, प्रत्येक घरातील वाढलेला पाण्याचा वापर आणि अपुरा साठा यामुळे अनेक कुटुंबांना खासगी टँकर किंवा पाणी विकत घेण्याची वेळ आली आहे. त्यामुळे सर्वसामान्यांच्या आर्थिक अडचणीही वाढत आहेत.

पाणीटंचाईमुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण असून दीर्घकालीन जलनियोजनाची मागणी जोर धरू लागली आहे. केवळ टँकरपुरवठ्यावर अवलंबून न राहता जलसंधारणाची कामे, पावसाचे पाणी साठवण, जलस्रोतांचे पुनर्भरण आणि भविष्यातील पाणीपुरवठ्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची गरज तज्ज्ञांकडून व्यक्त होत आहे.

दमदार पावसाची प्रतीक्षा आष्टीकरांना अजूनही लागून असून, पुढील काही दिवसांत पाऊस झाला नाही तर शहरासह परिसरातील पाणीटंचाई अधिक गंभीर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.



# माजलगाव येथे गुरु पौर्णिमाचा उत्सव साजरा

माजलगाव । प्रतिनिधी

येथील श्री.स्वामी समर्थ केंद्र शाहुनगर केंद्राच्या वतीने माजलगाव येथे ग्राम अभियान अंतर्गत पोहनेर,दिग्रस, दिंद्रुड, केसापुरी, सादोळा, पुरुषोत्तमपुरी, घाळाटवाडी,मनुरवाडी,अळसेवाडी,उमरी पारगाव,नित्रुड,खरात आडगाव,मनुर,ढोरगाव व गंगामसला या ठिकाणी श्री स्वामी समर्थ महाराजांचे अभिषेक भूपाळी आरती १०:३० ची निवेद्य आरती व सर्व सेवेकर यांना गुरुपद देण्यात आले.अशा विविध कार्यक्रमाने हा गुरूपौर्णिमेचा उत्सव मोठ्या उत्साहात व आनंदी वातावरण साजरा करण्यात आला असता सेवेकरी शेकडोच्या संख्येने उपस्थित होते.

राज्य लोकतंत्र ३१ जुलै २०२६

**CHANGE IN NAME**

I NAVNATH PANDURANG MUNDE SON OF PANDURANG DADARRAO MUNDE

RESIDING AT, BANKARANJA

POST:- CHANDANSAWARGAON. TALUKA - KAIJ DISTRICT -BEED

CHANGED MAHARASHTRA HAVE

CHANGE MY NAME FOR

MUNDE NAVNATH PANDURANG TO NAVNATH PANDURANG MUNDE.

HENCEFORTH I SHALL BE KNOWN AS NAVNATH PANDURANG MUNDE FOR ALL PURPOSES.

ALL CONCERNED PER PERSONS ARE REQUESTED TO TAKE NOTE

NAME CHANE DATE-16/07/2026

**टी.सी.हरवला आहे**

हर्षद श्रीकृष्ण शिंदे या नावाचा इयत्ता १२ वी विज्ञान पास चा टीसी बीड परळी बसमध्ये हरवला आहे सापडल्यास खाली नंबर वर संपर्क साधावा

संपर्क : ७५०७०११२०७

**जाहीर प्रगटन**

मा. के. सी. माने सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात, बीड, ता.जि. बीड किरकोळ दिवाणी अर्ज कमांक ११६३/२०२६

CNR No. MHBI02000020852026

अर्जदार अभिषेक सतिष चव्हाण व इतर वि. निरंक (मार्फत ॲड. आर. आर. शिंदे) अभिषेक पि. सतिष चव्हाण, वय-२६ वर्ष धंदा-शिक्षण, रा. जिजामाता कॉलनी, काशीनाथ नगर, पांगरी रोड बीड ता. जि. बीड

अर्मिला ४. सतिष चव्हाण, वय-४८ वर्ष, धंदा घरकाम, रा. जिजामाता कॉलनी, काशीनाथ नगर,

पांगरी रोड बीड ता. जि. बीड

गैरअर्जदारः- विरुद्ध

१.लक्ष्मीबाई प्र. भानुदास चव्हाण, वय ७२ वर्षे, बंदा पेन्शनर, रा. जिजामाता कॉलनी, काशीनाथ नगर, पांगरी रोड बीड ता. जि. बीड २. श्रध्दा पि. सतिष चव्हाण, वय-२८ वर्षे, धंदा-शिक्षण, रा. जिजामाता कॉलनी, काशीनाथ नगर, पांगरी रोड बीड ता. जि. बीड

**मागणी अर्ज : बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे वारस म्हणून प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

वरील अर्जदार क १२ व गैरअर्जदार व २ यांनी या न्यायालयात मयत सविष भानुदासराव चव्हाण यांचे वारस असल्याबकाचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी गयत सतिष भानुदासराव चव्हाण यांचा दिनांक २४/१२/२०१९ रोजी जिल्हा रूग्णालय बीड येथे त्यांचा मृत्यु झाला आहे. वरील अर्जदार व गैरअर्जदा यांनी या न्यायालयात वरील मयताचे वारस असल्या बायत वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार क १ हा मयताचा मुलगा असून अर्जदार क. २ ही गयताची पत्नी आहे व गैरअर्जदार क. १ ही मयताची आई आणि गैरअर्जदार क. २ ही मयताची मुलगी आहे. वरील अर्जदार व गैरअर्जदारा शिवाय मयताचे इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत

मयत सतिष भानुदासराव चव्हाण यांचे मृत्युनंतर वरील अर्जदार व गैरअर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामाकरीत व इतर कार्यालयीन उपयोगा करीता सदर बारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहू मयतांचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन दै. संकेत मध्ये प्रसिद इवल्यापासुन तीस दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपली हरकत कळयावी जर मुदतीत कोणीही हरकत न कळविल्यास हे न्यायालय अर्जदारांचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना भयतांचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी

प्रकरणातील पुढीज तारीख ३१/०८/२०२५

आज दिनांक २८ माहे जुलै २०२० रोजी माझ्या सहीने छु न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**आदेशावर**
**अधिक्षक दिवाणी न्यायालय व.स्तर बीड**

कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार, आष्टी यांचे कार्यालय
(दंड-विभाग)
ता. आष्टी जि. बीड
Email id-tahsildarashtigmail.com
क्र.२०२६ /दंड. विभाग/जन्म-मृत्यू/कावी-
दूरध्वनी क्र. (०२४४१) २८२५४२ दि २९/०७/२०२६

**जाहीरनामा**

**जन्म मृत्यू नोंदणी प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

जन्म आणि मृत्यू ची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११(३) अन्वये

सर्व जनतेस मौजे तवलवाडी, ता. आष्टी. जि. बीड यांना जाहीर केले जाते कि, विजय विठ्ठल जगताप रा. तवलवाडी ता. आष्टी जि.बीड यांनी त्यांचे नामे समृद्धी व शिवराज विजय जगताप रा. तवलवाडी ता. आष्टी जि.बीड याची जन्म/ मृत्यू दि २७/०१/२०१२ व दिनांक १६/११/२०१७ रोजी मोजे तवलवाडी ता. आष्टी जि.बीड येथे झाला असून अर्जदारास सदर जन्माची कायदेशीर नोंद असल्याबाबत प्रमाणपत्र मिळावे म्हणून या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करीता सदरहू अर्जदाराचे यांची मुले यांचे कायदेशीर जन्म/मृत्यू दिनांक कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिद्धी तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्याने ह्या कार्यालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरच असे कळविण्यात येते कि, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहु अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू जन्म नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. २५/०७/२०२६ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला.

**आदेशावरून**
**स्वाक्षरीत /-**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा**
**तहसिलदार आष्टी**

# लोकांचे संसार जळायला लागलेत अन् तुम्ही म्हणता बघून घेतो, म्हणजे काय?

## शेतकरी पिक विमा प्रश्नावर आमदार तानाजी सावंत संतप्त, तहसीलदारांनाच सुनावलं

धाराशिव : खरीप पीक विमा २०२५च्या भरपाईतील तफावतीवरून आमदार तानाजी सावंत यांनी थेट वाशीच्या तहसीलदारांना फोन करून शेतकऱ्यांवर होणारा अन्याय खपवून घेतला जाणार नाही, असा स्पष्ट इशारा दिला आहे. तहसीलदारांनी विमा प्रश्नात लक्ष न घातल्याने तानाजी सावंत आक्रमक झाल्याचे पाहायला मिळालेय. 'लोकांचे संसार जळायला लागलेत आणि तुम्ही बघून घेता, म्हणजे का तुम्ही संवेदनशील नाहीत का?' असा सवाल त्यांनी तहसीलदारांना केला. तानाजी सावंत आणि तहसीलदार यांच्या संवादाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. तसेच विमा कंपन्यांच्या प्रतिनिधींशी तातडीने चर्चा करून भरपाईतील तफावतीचा जाब विचारावा तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काची जास्तीत जास्त भरपाई मिळण्यासाठी त्वरित कार्यवाही करावी, असे निर्देश त्यांनी दिले.

दरम्यान, शेजारच्या तालुक्यांमध्ये प्रति हेक्टर सुमारे २० हजार रुपयांपर्यंत विमा मंजूर झाला असताना, भूम-परांडा-वाशी मतदारसंघातील






अनेक महसुली मंडळांमध्ये केवळ ९०० ते ३,५०० रुपयांपर्यंतच भरपाई जाहीर झाल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. राज्यभरातील शेतकऱ्यांनी पीक विम्याकडे पाठ फिरवयलचे चित्र आहे. पीक विम्याच्या आकडेवारीतून समोर आलेलं चित्र केवळ धक्कादायक नाही, तर धोरणातील बदलांचा परिणामही दाखवणारं आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा तब्बल ९ लाखांहून अधिक शेतकऱ्यांनी पीक विमा भरलेलाच नाही. सर्वाधिक फटका मराठवाड्याला बसला असून, केवळ छत्रपती संभाजीनगर विभागात जवळपास ७ लाख शेतकरी कमी झाले आहेत. यामागे केवळ शेतकऱ्यांची नाराजी नाही, तर यंदापासून पीक विमा योजनेतील पाच जोखीम ट्रिगर वगळण्यात आल्याचा मोठा परिणाम असल्याचं सांगितलं जात आहे. म्हणजेच आता नुकसानभरपाई मिळण्याच्या शक्यता कमी झाल्याने अनेक शेतकऱ्यांनी विम्याकडे पाठ फिरवल्याचं चित्र आहे.

शेतात बियाणं पेरल्यापासून ते काढणीपर्यंत आणि त्यानंतर शेतमालाच्या विक्रीपर्यंत शेतकऱ्यांना अनेक संकटांचा सामना करावा लागतो. कधी कमी होणारा तर कधी धो-धो कोसळणारा पाऊस, पिकांवर पडणारे रोग, अचानक येणारं वादळ किंवा शेतात घुसणारी जनावरं.. यापैकी कुठलंही संकट आलं पीक वाया गेलं, तर पीकविम्याचा आधार शेतकऱ्यांना असतो. पण या पीकविम्यावरचा शेतकऱ्यांचा विश्वास कमी होतोय की काय, असा प्रश्न सध्या पडलाय. कारण अल निनोचं संकट असतानाही पीकविमा घेणाऱ्यांची संख्या यंदा घटलीय.

# देशी गाई संगोपनातील महाराष्ट्र शासनाची वाटचाल



महाराष्ट्र कृषिप्रधान राज्य आहे आणि येथे विविध प्रकारच्या देशी गाईंच्या जाती आढळतात. यामध्ये मराठवाड्यातील नांदेड जिल्ह्यातील लाल कंधारी, लातूर जिल्ह्यातील देवणी, पश्चिम महाराष्ट्रात खिल्लार, उत्तर महाराष्ट्रात डांगी, तर विदर्भात गवळाऊ जातींचा समावेश आहे. देशी गाईचे दूध हे मानवी आहारातील अत्यंत पोषणमूल्य असलेला पदार्थ आहे, ज्याचा उपयोग आयुर्वेदिक चिकित्सा पद्धती आणि सेंद्रिय शेतीत मोठ्या प्रमाणावर केला जातो.देशी गाईंच्या दुधाचे मानवी आहारात स्थान असतेच, परंतु त्याचबरोबर देशी गाईंचे गोमूत्र व शेण यांचा सेंद्रिय शेतीसाठी महत्त्वपूर्ण उपयोग होतो. त्यामुळे, देशी गाईंच्या संख्येत होणारी घट ही चिंतेची बाब बनली आहे. महाराष्ट्रात देखील यामध्ये घट होत असताना, महाराष्ट्र शासनाने देशी गाईंचे संरक्षण आणि त्यांच्या संगोपनासाठी महत्त्वाची पावले उचलली आहेत. चला, जाणून घेऊया महाराष्ट्र शासनाच्या विविध उपाययोजनांबद्दल

महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ मध्ये सुधारणा करून महाराष्ट्र प्राणी रक्षण सुधारणा अधिनियम १९९५ आणला गेला. या कायद्यानुसार २०१५ पासून महाराष्ट्र राज्यात गोवंशांची (गाय, बैल, वळू, वासरे) हत्या पूर्णपणे बंदी केली आहे. या कायद्याअंतर्गत राज्यात कुणालाही गोवंशांची कत्तल करणे, कत्तलीसाठी वाहतूक करणे, किंवा कत्तल केलेले मांस विक्रीसाठी आणणे किंवा ताब्यात ठेवणे हे कायद्याने निषिद्ध आहे. या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांना पाच वर्षांपर्यंत कारावासाची शिक्षा किंवा १०,००० रुपये दंड, किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. या कायद्यामुळे देशी गाईंच्या संरक्षणाला मोठा हातभार लागला आहे.

देशी गाईस राजमाता गोमाता घोषित करणे

भारतीय संस्कृतीत देशी गाईला नेहमीच विशेष महत्त्व दिले गेले आहे. आयुर्वेदात पंचगव्याचा वापर आणि सेंद्रिय शेतीत गोमूत्र व शेण यांचे महत्त्व लक्षात घेत, महाराष्ट्र शासनाने ३० सप्टेंबर २०२४ रोजी देशी गाईला राज्य माता 'गोमाता' म्हणून घोषित केले आहे. यामुळे देशी गाईंच्या संगोपनास अधिक अधिकार आणि संरक्षण मिळाले आहे.

गोसेवा आयोगाची स्थापना

महाराष्ट्रात प्राणी संरक्षण व संवर्धनासाठी अनेक संस्था कार्यरत आहेत. त्यांचे कार्यक्षेत्र विस्तारण्यासाठी आणि त्यांचे कार्यप्रदर्शन सुधारण्यासाठी महाराष्ट्र गोसेवा आयोग २०२३ मध्ये स्थापित करण्यात आला. या माध्यमातून पशु संरक्षण, गोवंश संरक्षण, अनुवंशिक सुधारणा, आणि वैरण विकासासाठी काम केले जात आहे. आयोगाच्या अध्यक्षपदी डॉ. चंद्रशेखर मुंदडा आणि सदस्य सचिव म्हणून डॉ. मंजुषा जोशी कार्यरत आहेत. यामुळे गोवंशाच्या संवर्धनाला एक मजबूत आधार मिळाला.

सुधारित गोवर्धन गोवंश सेवा केंद्राची स्थापना

देशी गाईंच्या संरक्षणासाठी महाराष्ट्र शासनाने सुधारित 'गोवर्धन गोवंश सेवा केंद्र' स्थापन केले आहेत. या केंद्रांत गोवंशांची देखभाल, गोमूत्र व शेणापासून विविध उत्पादने तयार करण्यासाठी विशेष सुविधा दिल्या जातात. या केंद्रात गोवंशांच्या देखभालीसाठी गोशाळा व गोवंश असलेल्या संस्थांना अनुदान देण्यात येते, जेणेकरून त्यांना चारापाणी, निवाऱ्याची सोय केली जाऊ शकेल. प्रत्येक तालुक्यात एक 'गोवर्धन गोवंश सेवा केंद्र' स्थापन करण्याचे उद्दिष्ट आहे.

देशी गाईंसाठी परिपोषण आहार

महाराष्ट्र शासनाने २०२४ पासून गोशाळांमध्ये संगोपन करणाऱ्या देशी गाईंसाठी ५० रुपये प्रति गोवंश अनुदान देण्याची योजना सुरू केली आहे. यासाठी गोशाळांना पंरपरागत गोवंशाची देखभाल आणि संगोपन करणे, व त्यांना योग्य आहार देणे आवश्यक आहे. गोशाळेचे नोंदणी करणाऱ्या संस्थाचं या अनुदानासाठी पात्र आहे.महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेअंतर्गत गोठा बांधणीसाठी अनुदान दिले जाते. महाराष्ट्रात शेतकऱ्यांना त्यांच्या गोवंशाच्या संख्येनुसार ७७ हजार ते २ लाख ३१ हजार रुपयांपर्यंत गोठा बांधणीसाठी अनुदान मिळते. यामुळे शेतकऱ्यांना आपल्या पशुधनाची देखभाल करण्यासाठी आवश्यक गोठे बांधता येतात, आणि त्यांची आर्थिक स्थिती मजबूत होऊ शकते.

चारा लागवडीसाठी शंभर टक्के अनुदान

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत चारा लागवडीसाठी शंभर टक्के अनुदान दिले जाते. हे अनुदान विशेषत: वन जमिनीजवळील गायरानसाठी दिले जाते, ज्यामुळे शेतकऱ्यांना गोवंशासाठी योग्य चारा लागवड करता येतो.देशी गाईंचे संवर्धन हे केवळ आर्थिक दृष्ट्या महत्त्वाचे नाही, तर ते पर्यावरणीय दृष्ट्या देखील आवश्यक आहे. देशी गाईंच्या दुधाचे पोषणमूल्य, गोमूत्र व शेणाचे सेंद्रिय शेतीमध्ये योगदान, आणि शेतकऱ्यांना आर्थिक समृद्धी मिळवून देणारे फायदे लक्षात घेता, महाराष्ट्र शासनाने उचललेले पाऊले अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. यामुळे देशी गाईंचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी सरकारच्या विविध योजनांचा अधिकाधिक लाभ घेणे आवश्यक आहे. आपण सर्वांनी एकत्र येऊन देशी गाईंच्या संगोपनात सहभागी झाल्यास महाराष्ट्रातील गाईंचे संरक्षण सुनिश्चित होईल, आणि शेतकऱ्यांना एक समृद्ध आणि सशक्त भविष्य मिळेल.

# काजू फेणी: परंपरेचा गोडसर स्वाद आणि सांस्कृतिक वारसा

काजू फेणी हा केवळ एक मद्य प्रकार नाही, तर ती आपली सांस्कृतिक वारसा आणि परंपरेचा महत्त्वाचा भाग आहे. यामध्ये आरोग्यदायी फायदे, स्वाद, आणि आंतरराष्ट्रीय बाजारातील मागणी यामुळे ती एक अनोखी उत्पादने ठरते.काजू फेणी हा गोवा आणि कोकण भागात प्रसिद्ध असलेला एक पारंपरिक मद्य प्रकार आहे. तो काजू फळाच्या रसापासून तयार केला जातो आणि याची चव ताजी, गोडसर आणि थोडीशी आंबटसर असते. काजू फेणी ही केवळ एक पेय नसून, ती स्थानिक संस्कृती आणि परंपरेचा महत्त्वाचा भाग आहे. आजच्या काळात ही फेणी आंतरराष्ट्रीय बाजारातही आपले स्थान निर्माण करत आहे.

प्रक्रिया:

काज फेणी तयार करण्यासाठी काही महत्त्वाचे टप्पे आहेत, ताज्या पिकलेल्या काजू फळांची निवड केली जाते. फळं ताजी आणि चांगल्या गुणवत्तेची असावी लागतात. रस काढणे: फळांचे गळे आणि साल काढून, रस काढण्यासाठी विशेष यंत्रांचा वापर केला जातो. हा रस काजू रस म्हणून ओळखला जातो. फर्मेंटेशन (आंबवणे): काजू रस मोठ्या टाक्यांमध्ये ठेवून २-३ दिवस आंबवला जातो. या प्रक्रियेदरम्यान रसामध्ये असलेले साखर अल्कोहोलमध्ये बदलते. डिस्टिलेशन (आसवन): आंबवलेला रस डिस्टिल करून त्यातील मद्य घटक वेगळे केले जातात. या प्रक्रियेमुळे फेणीला तीव्र पण गोडसर चव येते.साठवणूक:तयार झालेली फेणी गाल्वनाईज्ड स्टील किंवा माठांमध्ये काही आठवड्यांसाठी ठेवली जाते, ज्यामुळे तिची चव अधिक सुधारते.

काजू फेणीचे आरोग्यदायी फायदे:



हजम होण्यास मदत: काजू फेणी पचन सुधारण्यास मदत करते. ती पचनसंस्थेला सक्रिय ठेवते. अँटीऑक्सिडेंट गुणधर्म: काजू फळातील अँटीऑक्सिडेंट्स फेणीमध्ये टिकून राहतात, जे शरीरातील हानिकारक फ्री रेडिकल्सवर नियंत्रण ठेवतात. हृदयासाठी फायदेशीर: कमी प्रमाणात सेवन केल्यास हृदयासाठीही फायदेशीर ठरते, कारण ती रक्तसंचार सुधारते.सर्दी-खोकल्यावर आराम:गोडसर आणि गरम असल्यामुळे सर्दी-खोकल्यावर आराम मिळतो.रिलॅक्सेशन (विश्रांती):तणाव कमी करण्यासाठी आणि विश्रांतीसाठी उपयुक्त आहे.

बाजारातील मागणी:

देशांतर्गत मागणी:काजू फेणी भारतात विशेषतः गोवा, कोकण आणि इतर किनारी भागांमध्ये खूप मागणीत आहे. ती स्थानिक महोत्सव, विवाहसोहळे, आणि खासगी पार्टीमध्ये वापरली जाते. आंतरराष्ट्रीय मागणी: गोवा आणि कोकणातील काजू फेणीला आंतरराष्ट्रीय बाजारातही चांगली मागणी आहे. विशेषतः अमेरिका, युरोप, आणि मध्य पूर्वेतील बाजारांमध्ये ती निर्यात केली जाते.निर्यात संधी:भारत सरकारच्या मदतीने आणि आंतरराष्ट्रीय ब्रँडिंगमुळे काजू फेणीची निर्यात वाढत आहे. ही निर्यात देशाला परकीय चलन देखील मिळवून देते.

परंपरागत आणि प्रीमियम उत्पादन: काजू फेणीला पारंपरिक आणि ऑर्गेनिक उत्पादन म्हणूनही बाजारात स्थान मिळाले आहे. यामुळे ती उच्च श्रेणीच्या बार्स आणि रेस्टॉरंट्समध्येही वापरली जाते.

निष्कर्ष:काजू फेणी हा केवळ एक मद्य प्रकार नाही, तर ती आपली सांस्कृतिक वारसा आणि परंपरेचा महत्त्वाचा भाग आहे. यामध्ये आरोग्यदायी फायदे, स्वाद, आणि आंतरराष्ट्रीय बाजारातील मागणी यामुळे ती एक अनोखी उत्पादने ठरते. कोकण आणि गोव्यातील उद्योजकांनी काजू फेणीच्या उत्पादन व निर्यात क्षेत्राचा अधिकाधिक उपयोग करावा, जेणेकरून भारताचा परंपरागत मद्य उद्योग जागतिक स्तरावर पोहोचू शकेल.एपसश्रळीह डींारीू: घरर्क्षी ऋशपळ डुशशीं ढरींशे ष ढीरवळींळेप रपव उीश्रींीरश्र क्षीळींरसश झीलश्रळीहशव ेप: ०१ -ीिळश्र २०२५, १०:३७ खडढ कृषी पत्रकारितेसाठी आपला पाठिंबा दर्शवा प्रिय वाचक, आमच्यात सामील झाल्याबद्दल धन्यवाद. आपल्यासारखे वाचक आमच्यासाठी कृषी पत्रकारितेसाठी प्रेरणा आहेत. कृषी पत्रकारितेला अधिक बळकट करण्यासाठी आणि ग्रामीण भारतातील कानाकोप ळप्यात शेतकरी आणि लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी आम्हाला तुमचे समर्थन किंवा सहकार्य आवश्यक आहे. आपले प्रत्येक सहकार्य आमच्या भविष्यासाठी मोलाचे आहे.




### जागतिक दिवस
### आंतरराष्ट्रीय फ्रेंडशिप डे

### महत्वाच्या घटना

१४९८: पश्चिम गोलार्धात तिसरा प्रवास करताना ख्रिस्तोफर कोलंबस हे त्रिनिदाद बेटांचा शोध लावणारे पहिले युपोपीय ठरले.
१६५७: मुघलांनी विजापूरचा कल्याणी किल्ला जिंकला.
१६५८: औरंगजेब मुघल सम्राट बनला.
१८५६: न्यूझीलंडची राजधानी ख्राइस्टचर्चची स्थापना
१९३३: महात्मा गांधी यांनी साबरमती आश्रम सोडला.
१९३७: के. नारायण काळे यांनी दिग्दर्शित केलेला 'वहाँ' हा 'प्रभात'चा चित्रपट मुंबईतील 'मिनर्व्हा' टॉकीजमधे प्रदर्शित झाला.
१९४८: भारतात कलकत्ता शहरात प्रथम राज्य सेवा परिवहनाची स्थापना करण्यात आली.
१९५४: इटालियन गिर्यारोहकांनी के-२ (मांऊट गॉडविन ऑस्टिन) हे जगातील दुसर्या क्रमांकाचे शिखर प्रथमच सर केले.
१९५६: कसोटी सामन्यातील एका डावात सर्व १० गडी बाद करण्याचा विक्रम करणारा जिम लेकर हा पहिला गोलंदाज बनला. या कसोटी सामन्यात त्याने १९ बळी घेतले.
१९८२: सोवियत संघाने आण्विक चाचणी केली.
१९६४: रेंजर ७ अंतराळ यानाने चंद्राचे पहिले स्पष्ट छायाचित्रे काढले.
१९९२: जॉर्जियाचा संयुक्त राष्ट्रांत (णपळींशव छरींळेपी) प्रवेश
१९९२: भारत रत्न पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय सतारवादक पं. रविशंकर यांना रॅमन मॅगसेसे पुरस्कार जाहीर
२०००: वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषदेचे (उडखठ) महासंचालक डॉ. रघुनाथ माशेलकर आणि प्रगत तंत्रज्ञान केंद्राचे (उ-ढ) डॉ. डी. डी. भवाळकर यांना एच. के फिरोदिया पुरस्कार जाहीर
२००१: समाजात मूलभूत स्वरुपाची क्रांतिकारक जडणघडण करण्यासाठी झटणार्या व्यक्तींना देण्यात येणारा 'राजर्षी शाहूमहाराज समता पुरस्कार' दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांना जाहीर
२००६: फिदेल कॅस्ट्रो यांनी आपल्या भावाला, राऊल यांच्याकडे सत्ता हस्तगत केली.
२०१२: मायकेल फेल्प्स यांनी ऑलिम्पिकमध्ये जिंकलेल्या सर्वाधिक पदक जीकाण्याचा विक्रम मोडला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७०४: गॅब्रिअल क्रॅमर - स्विस गणिती (मृत्यू: ४ जानेवारी १७५२)
१८००: फ्रेडरिक वोहलर - जर्मन रसायनशास्त्रज्ञ (मृत्यू: २३ सप्टेंबर १८८२)
१८७२: लक्ष्मण रामचंद्र पांगारकर - संतसाहित्याचे अभ्यासक, चरित्रकार व गाथा संपादक (मृत्यू: १० नोव्हेंबर १९४१)
१८८०: धनपतराय श्रीवास्तव ऊर्फ 'मुन्शी प्रेमचंद' - हिन्दी साहित्यिक. त्यांनी १५ कादंबर्या व ३०० कथा लिहील्या. त्यांचे २४ कथासंग्रह प्रसिद्ध झाले. (मृत्यू: ८ आक्टोबर १९३६)
१८८६: फ्रेड क्विम्बी - अमेरिकन ॲनिमेशनपट निर्माते (मृत्यू: १६ सप्टेंबर १९६५)
१९०२: केशवा तथा के. शंकर पिळ्ले - व्यंगचित्रकार व लेखक, भारतातील राजकीय व्यंगचित्रांचे जनक, पद्मविभूषण (१९७६), 'चिल्ड्रन्स बुक ट्रस्ट' आणि 'शंकर्स इंटरनॅशनल डॉल्स म्युझियम' यांचे संस्थापक (मृत्यू: २६ डिसेंबर १९८९)
१९०७: दामोदर धर्मानंद कोसंबी - प्राच्यविद्या पंडित, गणितज्ञ, विचारवंत व इतिहासकार (मृत्यू: २९ जून १९६६)
१९१२: मिल्टन फ्रीडमन - नोबेल पारितोषिक विजेते अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ (मृत्यू: १६ नोव्हेंबर २००६)
१९१८: डॉ. श्रीधर भास्कर तथा 'दादासाहेब' वर्णेकर - संस्कृत पंडित (मृत्यू: १० एप्रिल २०००)
१९१९: भारतीय क्रिकेटपटू हेमू अधिकारी यांचा जन्म. (मृत्यू: २५ ऑक्टोबर २००३)
१९४१: अमरसिंग चौधरी - गुजरातचे मुख्यमंत्री (मृत्यू: १५ ऑगस्ट २००४)
१९४७: मुमताज - अभिनेत्री
१९५४: भारतीय अभिनेते आणि दिग्दर्शक मनिवंनान यांचा जन्म. (मृत्यू: १५ जून २०१३)
१९६५: जे. के. रोलिंग - हॅरी पॉटर मुळे प्रसिद्ध झालेल्या इंग्लिश लेखिका
१९९२: आहारतज्ज्ञ श्रेया आढाव यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७५०: जॉन (पाचवा) - पोर्तुगालचा राजा (जन्म: २२ आक्टोबर १६८९)
१८०५: भारतीय सैनिक धीरान चिन्नमलाई यांचे निधन. (जन्म: १७ एप्रिल १७६५)
१८६५: जगन्नाथ ऊर्फ 'नाना' शंकरशेठ - दानशूर व शिक्षणतज्ञ, आधुनिक मुंबईचे शिल्पकार (जन्म: १० फेब्रुवारी १८०३)
१८७५: अँड्रूयू जॉन्सन - अमेरिकेचे १७ वे राष्ट्राध्यक्ष (जन्म: २९ डिसेंबर १८०८)
१९४०: भारतीय कार्यकर्ते उधम सिंग यांचे निधन. (जन्म: २८ डिसेंबर १८९९)
१९६८: शतायुषी पंडित श्रीपाद दामोदर सातवळेकर - चित्रकार, संस्कृतपंडित, वेदांचे अभ्यासक-संशोधक विद्वान व लेखक. चारही वेदांच्या शुद्ध संहिता, समग्र सार्थ महाभारत, सार्थ अथर्ववेद इ. ग्रंथ त्यांनी लिहिले. ते हिन्दी, मराठी, गुजराती भाषांत प्रसिद्ध झाले. यांपैकी काही ग्रंथांचे अनुवाद ऊर्दू, कानडी, सिंधी, तेलगू व इंग्रजीमध्येही झाले. (जन्म: १९ सप्टेंबर १८६७)
१९८०: मोहम्मद रफी - पार्श्वगायक, पद्मश्री (जन्म: २४ डिसेंबर १९२४ - कोटला सुलतान सिंग, पंजाब)
२०११: रोमन कॅथोलिक चर्चचे धर्मगुरू जोसेफ अल्बर्ट रोजारियो यांचे निधन.
२०१४: भारतीय पत्रकार आणि लेखक नबरुण भट्टाचार्य यांचे निधन. (जन्म: २३ जून १९४८)







# ग्रामीण विकासाला प्राधान्य देत शिक्षण, आरोग्य व मानव विकास निर्देशांक उंचावण्यासाठी नियोजन करा-उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

## डीपीडीसी निधीचा पारदर्शक व परिणामकारक वापर करण्याच्या सूचना; दिवंगत अजितदादा पवार यांच्या विकासदृष्टीने काम करण्याचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा हा प्रामुख्याने ग्रामीण भागाचा जिल्हा असल्याने जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी ग्रामीण विकासाला सर्वोच्च प्राधान्य देणे आवश्यक आहे. शिक्षण, आरोग्य तसेच महिला व बालविकास हे मानव विकास निर्देशांक (एचडीआय) उंचावण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे घटक आहेत. त्यामुळे जिल्हा नियोजन विकास समिती (डीपीडीसी) अंतर्गत नियोजन करताना या विभागांसाठी पुरेसा निधी उपलब्ध करून द्यावा. उपलब्ध निधीचा परिणामकारक, पारदर्शक आणि गुणवत्तापूर्ण वापर करून त्याचा लाभ थेट नागरिकांपर्यंत पोहोचेल, याची सर्व संबंधित विभागांनी दक्षता घ्यावी, अशा स्पष्ट सूचना उपमुख्यमंत्री तथा



बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिल्या.

यावेळी बीड जिल्हाधिकारी कार्यालयात आज आयोजित जिल्हा परिषदेच्या विविध विभागाच्या आढावा बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी, खासदार बजरंग सोनवणे, आमदार धनंजय मुंडे, आमदार प्रकाश सोळंके, आमदार संदीप क्षिरसागर, आमदार विजयसिंह पंडीत, आमदार विक्रम काळे, पालक सचिव डॉ. राजेश देशमुख, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान, पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांच्यासह जिल्हा प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी, जिल्हा परिषद अधिकारी तसेच संबंधित विभागांचे प्रमुख उपस्थित होते. उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या की, ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार शिक्षण, सुलभ आरोग्य सेवा आणि महिला व बालकल्याण योजनांचा प्रभावी लाभ मिळणे ही शासनाची सर्वोच्च प्राथमिकता आहे. जिल्हा नियोजनातून मंजूर होणारा प्रत्येक रुपया हा लोकांच्या विकासासाठी खर्च झाला पाहिजे. विकासकामांच्या नियोजनात गुणवत्तेला प्राधान्य देत निधीचा योग्य, वेळेत आणि पारदर्शक पद्धतीने वापर होणे आवश्यक आहे. त्या पुढे म्हणाल्या की, दिवंगत अजितदादा पवार यांनी बीड जिल्ह्याच्या विकासासाठी वेळोवेळी दिलेल्या सूचना आणि विकासाचे जे धोरण निश्चित केले होते, त्याच विकासाभिमुख दृष्टिकोनातून सर्व विभागांनी कार्य करावे. लोकाभिमुख, परिणामकारक आणि उत्तरदायी प्रशासनाच्या माध्यमातून शासनाच्या योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी सर्व अधिकाऱ्यांनी समन्वयाने काम करावे. बैठकीत शिक्षण, आरोग्य, महिला व बालविकास, पाणीपुरवठा, ग्रामीण पायाभूत सुविधा आणि इतर विकासकामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. विविध योजनांच्या अंमलबजावणीचा वेग वाढवून निश्चित कालमर्यादेत कामे पूर्ण करण्याच्या सूचनाही उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

# निपाणी टाकळी उपसरपंच पद अखेर बरखास्त

### लक्ष्मण चव्हाणांवरील अविश्वास ठराव मा. बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांकडून कायम

माजलगाव / बीड : माजलगाव तालुक्यातील मौजे निपाणी टाकळी येथील ग्रामपंचायतीचे उपसरपंच लक्ष्मण सर्जेराव चव्हाण यांच्याविरुद्ध सर्वपक्षीय सदस्यांनी आणलेला अविश्वास ठराव मा. जिल्हाधिकारी, बीड यांनी वैध ठरवत कायम ठेवला आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या या निर्णयामुळे उपसरपंच लक्ष्मण चव्हाण यांचे पद अखेर बरखास्त झाले असून गावाच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

निपाणी टाकळी ग्रामपंचायतीचे उपसरपंच लक्ष्मण चव्हाण हे पदाचा व अधिकाराचा गैरवापर करत असल्याचा आरोप सदस्यांनी केला होता. गावातील मूलभूत समस्या जसे की स्वच्छता आणि पिण्याच्या पाण्याच्या सोयी-सुविधांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणे, ग्रामपंचायतीच्या अधिकृत ठरावांची अंमलबजावणी न करणे, इतर सदस्यांना विश्वासात न घेणे आणि त्यांच्यावर गुन्हेगारी स्वरूपाचे गंभीर गुन्हे दाखल असणे (माजलगाव ग्रामीण पो.स्टे. व दिंद्रूड पो.स्टे.) या कारणांमुळे सरपंच व बहुसंख्य सदस्यांचा त्यांच्यावरील विश्वास उडाला होता. या सर्व गंभीर बाबींची दखल घेत सरपंच श्रीमती. उषा भगवान राठोड व इतर सदस्यांनी तहसीलदार माजलगाव यांच्यासमोर अविश्वास प्रस्ताव मांडला होता. तहसीलदारांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या विशेष सभेत १० पैकी ८ सदस्यांनी ठरावाच्या बाजूने कौल दिल्याने उपसरपंचांवरील अविश्वास ठराव बहुमताने पारित झाला होता. कायदेशीर लढाई आणि जिल्हाधिकाऱ्यांचा निर्णय :- तहसीलदारांच्या आदेशाला आव्हान देत लक्ष्मण चव्हाण यांनी मा. जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे कलम ३५(३-ब) अन्वये अपील अर्ज दाखल करीत अविश्वास ठरावाची प्रक्रिया बेकायदेशीर असून कायदेशीर नियमांचे उल्लंघन झाल्याचा दावा करण्यात आला होता. या प्रकरणांत उत्तरवादी गैरअर्जदार (सरपंच व सदस्य) यांच्या बाजूने विधिज्ञ ॲड. अर्जुन बी. आडे (माजलगाव) यांनी मा. जिल्हाधिकाऱ्यांसमोर अत्यंत प्रभावी व सक्षम युक्तिवाद केला आणि कायदेशीर बाजू समोर आणली व त्यांना या प्रकरणांत बीड येथील विधिज्ञ ड. कपिलकुमार व्ही. बेदरे यांनी विशेष सहकार्य केले. १) अविश्वास प्रस्तावाची नोटीस सर्व सदस्यांना कायदेशीर मुदतीत बजावली होती. २) थेट निवडून आलेल्या सरपंचांना कायद्यानुसार मतदानाचा पूर्ण अधिकार आहे. ३) गुप्त मतदानाची मागणी न झाल्याने हात उंचावून मतदान घेणे पूर्णपणे वैध व पारदर्शक आहे. ४) लोकशाही मार्गाने २/३ पेक्षा जास्त बहुमताने पारित झालेला निर्णय तांत्रिक हरकतींच्या आधारे रद्द करता येत नाही. जिल्हाधिकाऱ्यांसमोर दोन्ही बाजूंचा युक्तिवाद, कागदपत्रे आणि शासकीय चौकशी अहवाल सखोल तपासल्यानंतर मा. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन (भा.प्र.से.ख.-.ड.) यांनी लक्ष्मण चव्हाण यांचा अपील अर्ज फेटाळून लावला आणि तहसीलदारांनी पारित केलेला अविश्वास ठरावाचा आदेश कायदेशीर व वैध ठरवून कायम ठेवला. या ऐतिहासिक निर्णयामुळे उपसरपंच लक्ष्मण चव्हाण यांचे उपसरपंच पद अधिकृतपणे बरखास्त झाले असून, निपाणी टाकळी ग्रामपंचायतीमध्ये लोकशाही व बहुमताचा विजय झाल्याची भावना ग्रामस्थांमधून व्यक्त केली जात आहे.

# मार्डी येथे गुरुपौर्णिमा उत्सव संपन्न

अंबड। प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील मार्डी येथील श्री सेवानंद महाराज मंदिरात बुधवार, दिनांक २९ जुलै रोजी सनातन संस्थेच्या वतीने भावपूर्ण वातावरणात गुरुपौर्णिमा महोत्सवाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या महोत्सवाला मार्डी गावातील २१७ हून अधिक धर्मप्रेमी ग्रामस्थांची उत्साही उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचा प्रारंभ गावकरी आणि धर्मप्रेमींनी गावातून काढलेल्या भव्य दिंडीने झाला. या दिंडीच्या माध्यमातून ग्रामस्थांना गुरुपौर्णिमा महोत्सवात सहभागी होण्याचे भावपूर्ण आवाहन करण्यात आले.



रामराज्य (हिंदु राष्ट्र) स्थापनेसाठी साधनेची आवश्यकता! - सौ. छाया देशपांडे, या वेळी उपस्थित धर्मप्रेमींना मार्गदर्शन करताना सनातन संस्थेच्या प्रवक्त्या सौ. छाया देशपांडे म्हणाल्या, गुरुपौर्णिमा हा केवळ एक सण नसून गुरूप्रती अनन्यसाधारण कृतज्ञता व्यक्त करण्याचा पवित्र दिवस आहे. ज्या ज्या वेळी धर्माला ग्लानी आली, त्या त्या वेळी धर्मसंस्थापनेचे कार्य महान गुरु-शिष्य परंपरेनेच केले आहे. आज संपूर्ण जग तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर उभे असून युवापिढी दिशाहीन होत आहे. अशा बिकट परिस्थितीत समाजाला तरणोपाय मिळण्यासाठी पुन्हा एकदा प्रभू श्रीरामाच्या 'रामराज्याची' (हिंदु राष्ट्राची) अत्यंत आवश्यकता आहे. या वेळी त्यांनी उपस्थितांना साधनेचे महत्त्व आणि दैनंदिन जीवनात धर्माचरण कसे करावे, याविषयी सखोल मार्गदर्शन केले. यावेळी सौ. बबीता सुरासे आणि सौ. मिनल सावे यांनी साधनेतून आलेल्या स्वतःच्या अनुभूतींचे कथन करून उपस्थितांचा भाव जागृत केला. संपूर्ण कार्यक्रमाचे संचालन कु. ज्ञानेश्वरी हाडबे आणि कु. मयुरी देशमुख यांनी केले. मार्डी गावातील ग्रामस्थांनी या गुरुपौर्णिमा महोत्सवासाठी मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध, भावपूर्ण आणि स्फूर्तीदायक झाल्याची प्रतिक्रिया उपस्थितांनी दिली.

# रेणुका देवी संस्थांच्या हद्दीत अनाधिकृत बांधकाम करणाऱ्या विरुद्ध कारवाई करा

मंठा। प्रतिनिधी

श्री रेणुका देवी संस्थांच्या हद्दीतील नगरपंचायतच्या अधिनस्त असलेल्या सभागृहावर अनधिकृत बांधकाम करून पत्राचे शेड उभारणाऱ्या संबंधितांविरुद्ध कारवाई करण्याची मागणी मंदिराचे विश्वस्त बालासाहेब ठोके यांनी केली आहे.

यासंदर्भात नगराध्यक्ष, मुख्याधिकारी यांना निवेदन देण्यात आले असून नगर पंचायत मंठा यांच्या अधिपत्याखाली बांधकाम करण्यात आलेल्या सभागृहावर मंदीर परिसरातील काही लोकांनी अनाधिकृतपणे अतिक्रमण करुन त्यावर पत्राचे शेड उभारले आहे.

वास्तविक पाहता सदरील सभागृह हे भक्तांच्या निवाऱ्याकरिता बांधकाम करण्यात आले आहे परंतू भक्तांना त्याचा प्रत्यक्ष काहीच फायदा होत नसून त्यावर पत्राचे शेड उभारुन गैरअर्जदार यांनी आपला मालकी हक्क दाखविला आहे. असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.सदरील अतिक्रमण तात्काळ काढून अतिक्रमण करणाऱ्या इसमाविरुध्द कडक कार्यवाही करावी व परत या जागेवर कोणी अतिक्रमण करणार नाही याची सक्त ताकीद देण्यात यावी. अशी मागणी करण्यात आली आहे.

# गुरु बिना ज्ञानाची प्राप्ती नाही -योगानंद महाराज



मंठा। प्रतिनिधी

गुरु बिना ज्ञानाची प्राप्ती नाही, जीवनाला योग्य दिशा देणारा हा गुरुच असतो. गुरुची सेवा केल्याने पुण्य मिळते आणि गुरूच्या आशीर्वादाने जीवन समृद्ध बनते असा उपदेश परमपूज्य तपस्वी श्री योगानंद महाराज यांनी केला.श्री योगेश्वर शिवमंदिर योगीधाम बुगानाईक तांडा दहिफळ (खं.) येथे गुरुपौर्णिमेनिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात ते भक्तांना मार्गदर्शन करत होते. यावेळी पंचक्रोशीतील शिष्यवृंदांनी परमपूज्य महाराजांचे पूजन करून दर्शन घेतले.

गुरु पौर्णिमेला सकाळपासूनच भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती. गुरु पूजन, भजन-कीर्तन आणि प्रवचनाने संपूर्ण दिवस अध्यात्माने भरून गेला होता. यावेळी बोलताना परमपूज्य योगानंद बापू महाराज म्हणाले की, गुरु हेच ब्रह्मा, विष्णू आणि महेश्वर आहेत. शिष्याने गुरुंच्या चरणी पूर्ण श्रद्धा ठेवली पाहिजे. आजच्या काळात माणसाला दिशा देण्यासाठी सद्गुरूंची नितांत गरज आहे असे सांगितले. यावेळी हजारो भक्तगण उपस्थित होते. बुगा नाईक तांडा व भूरा नाईक तांडा येथील सर्व ग्रामस्थांनी सहकार्य केले. यावेळी पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी प्रसादाचा लाभ घेतला.

# संपादित केलेल्या घराचा मावेजा न मिळाल्यास कार्यकारी संचालक कार्यालयासमोर उपोषण

मंठा। प्रतिनिधी

येथील पाटोदा साठवण तलावअंतर्गत लिंबेवडगाव येथील गावठाणातील घरे बुडीत क्षेत्रकरिता संपादित करण्यात आली होती. संबंधित संपादित केलेल्या घरांचा मावेजा मिळावा यासाठी लिंबेवडगाव येथील ग्रामस्थांनी गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक (ईडी) यांना लेखी निवेदन देऊन मागणी केली आहे. निवेदनात पुढे म्हटले आहे की, संपादन प्रक्रियेत अंतिम निवाडा प्रसिद्ध करण्यात आला आहे

परंतु अद्यापही खरेदी प्रक्रिया सुरू झालेली नाही. तसेच मागील वर्षात गावात मोठ्या प्रमाणात पाणी शिरले होते, अनेक नागरिकांचे यामध्ये मोठे नुकसान झाले आहे. यावेळी आपल्या कार्यालयाच्या वतीने नुकसान झाल्याच्या जागेची स्थळ पाहणी करून तसे पंचनामे देखील करण्यात आले होते व सदरील प्रकरणी तात्काळ कारवाई करण्याचे आश्वासन देखील देण्यात आले होते. परंतु सदरील आश्वासनास वर्ष पूर्ण झाले असतानाही कुठल्याही प्रकारची कारवाई करण्यात आलेली नाही.

तरी तात्काळ खरेदी प्रक्रिया राबवून आम्हाला संपादीत क्षेत्राचा मावेजा मिळवून द्यावा नसता दिनांक ३ ऑगस्ट २०२६ पासून मा.कार्यकारी संचालक (इंडी) कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा निवेदनात शेवटी देण्यात आला आहे. सदरील निवेदनावर समस्त गावकऱ्यांच्या सह्या आहेत.पविभागीय अभियंता पद दीड महिन्यापासू रिक्त मंठा लघुपाटबंधारे कार्यालयाचे उपविभागीय अभियंता श्री मोहिते यांनी पदभार सोडून जवळपास दीड महिना उलटला असतानाही कुठलाही अधिकारी अद्यापपर्यंत मंठा कार्यालयाचा पदभार स्वीकारत नसल्याने प्रकल्पग्रस्त भागातील नागरिकांना अडचणींना तोंड द्यावे लागत आहे.

# मुस्कान शेख मृत्यू प्रकरणाची धाराशिवच्या त्रिसदस्यीय समितीकडून चौकशी; आज बीडमध्ये जबाब नोंदविणार

### स्थानिक चौकशी समितीवर नातेवाईकांचा आक्षेप; वरिष्ठ स्तरावर स्वतंत्र समितीची नियुक्ती : डॉ. गणेश ढवळे

बीड। प्रतिनिधीफ

बीड जिल्हा रुग्णालयातील माता व बाल रुग्णालयात उपचारादरम्यान झालेल्या मुस्कान शेख (वय २४, रा. इस्लामपुरा, बीड) यांच्या मृत्यू प्रकरणाची चौकशी आता धाराशिव येथील त्रिसदस्यीय समितीकडून करण्यात येणार आहे. स्थानिक चौकशी समितीवर नातेवाईकांनी निष्पक्षतेबाबत आक्षेप घेतल्यानंतर वरिष्ठ स्तरावर ही समिती नियुक्त करण्यात आली असून,आज शुक्रवार (दि. ३१ जुलै) रोजी सकाळी ११ वाजता बीड जिल्हा रुग्णालयातील व्हीसी हॉलमध्ये संबंधितांचे जबाब नोंदविले जाणार असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे मुख्य प्रचार प्रमुख डॉ. गणेश ढवळे यांनी दिली.मुस्कान शेख यांच्यावर १० जुलै रोजी नव्या माता व बाल रुग्णालयात सिझेरियन शस्त्रक्रिया करण्यात आली होती. शस्त्रक्रियेपूर्वी जिल्हाधिकारी विवेक जॉनसन, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सतीशकुमार सोळंके आणि अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नागेश चव्हाण यांनी रुग्णाची भेट घेत संवाद साधला होता. मात्र शस्त्रक्रियेनंतर मुस्कान शेख यांचा मृत्यू झाल्याने आरोग्य यंत्रणा आणि प्रशासनाच्या



कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले.

या प्रकरणात वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कथित हलगर्जीपणामुळे वेळेवर उपचार न मिळाल्याने मृत्यू झाल्याचा आरोप करत दोषींवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी नातेवाईकांनी केली आहे.दरम्यान, २० जुलै रोजी डॉ. गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा रुग्णालयासमोर आंदोलन करण्यात आले होते. त्यावेळी अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नागेश चव्हाण यांच्यासमवेत झालेल्या चर्चेदरम्यान नातेवाईकांनी स्थानिक चौकशी समितीतील सदस्यांवर आक्षेप नोंदवत ही समिती निष्पक्ष चौकशी करणार नसल्याचे म्हटले होते.या पार्श्वभूमीवर डॉ. गणेश ढवळे यांनी दिलेल्या निवेदनासह समाजमाध्यमांवरील नातेवाईकांच्या प्रतिक्रियांचा विचार करून प्रकरणाची चौकशी वरिष्ठ स्तरावरून करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार धाराशिव जिल्हा रुग्णालयातील डॉ. इस्माईल मुल्ला (स्त्रीरोगतज्ज्ञ), डॉ. नानासाहेब गोस्वामी (शल्यचिकित्सक) आणि डॉ. प्रशांत रेवडकर (भिषक) यांची त्रिसदस्यीय चौकशी समिती नियुक्त करण्यात आली असल्याचे जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयाने कळविले आहे.या समितीसमोर जबाब नोंदविण्यासाठी स्त्रीरोगतज्ज्ञ, भूलतज्ज्ञ, वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, अधिपरिचारिका तसेच संबंधित ओटी व आयसीयू कर्मचाऱ्यांसह अनेक अधिकारी व कर्मचाऱ्यांना ३१ जुलै रोजी सकाळी ११ वाजता व्हीसी हॉल, जिल्हा रुग्णालय, बीड येथे उपस्थित राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी या प्रकरणात दोषींवर तातडीने कारवाई करण्याची मागणी करत, केवळ चौकशी समित्यांचा फार्स नको, दोषींवर कठोर कारवाई करा, अशी भूमिका घेतली आहे. या मागणीसाठी शुक्रवार, दि. ३१ जुलै रोजी पालकमंत्री ना. सुनेत्रा पवार यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयात होणाऱ्या आढावा बैठकीवेळी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात येणार असल्याचा इशारा त्यांनी लेखी निवेदनाद्वारे दिला आहे.

**टीसी हरवली आहे**

**शेख मुजमील शेख मकबूल यांची मत्स्योदरी विद्यालय अंबड इयत्ता १० वी पासची टी.सी. अंबड जालना प्रवास करीत असतांना हरवली आहे. कोणाला सापडल्यास संपर्क साधावा.**

**संपर्क**

९१३०२०९०२०

# वारोळा आश्रमशाळेची शिष्यवृत्ती परीक्षेत ऐतिहासिक भरारी; तब्बल ११ विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र

बीड। प्रतिनिधी

जय भवानी आश्रमशाळा पाचेगाव (दामू नाईक तांडा) संस्थांतर्गत कार्यरत प्राथमिक आश्रमशाळा वारोळा (ता. माजलगाव) येथील विद्यार्थ्यांनी इयत्ता चौथीच्या शिष्यवृत्ती परीक्षा २०२६ मध्ये ऐतिहासिक यश संपादन केले आहे. परीक्षेस बसलेल्या २५ विद्यार्थ्यांपैकी तब्बल ११ विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले असून, शाळेच्या शैक्षणिक इतिहासातील ही आतापर्यंतची सर्वात उल्लेखनीय कामगिरी मानली जात आहे.

ऊसतोड कामगार, विमुक्त जाती-भटक्या जमाती आणि सामाजिकदृष्ट्या वंचित घटकांतील या विद्यार्थ्यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत गुणवत्तेचा झेंडा फडकावला. यात विराट सतीशकुमार तौर (२१२ गुण) याने प्रथम क्रमांक मिळवला. याशिवाय रेश्मा चव्हाण (१८६), मयुरी मोरे (१७६), तनुजा लबासे (१७४), लौकिक लेंडाळ (१६८), वैष्णवी तौर (१६६), साईराज कवडे (१६४), स्वरा डावकर (१६२), सिद्धांत पवार (१५२), श्रेया डावकर (१४४) व चैतन्य जगताप (१४४) यांनी बाजी मारली. शाळेत नियमित अध्यापनासोबतच नियोजनबद्ध सराव, प्रश्नपत्रिका उकल, वैयक्तिक मार्गदर्शन व शंका निरसनावर भर देण्यात आला होता. योग्य संधी व मार्गदर्शन मिळाल्यास ग्रामीण व वंचित मुलेही यशाचे शिखर गाठू शकतात, हेच या निकालाने सिद्ध केले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष बाबुरावजी जाधव, सचिव दिलीप जाधव, सहाय्यक संचालक दत्तात्रय क्षीरसागर, वर्ग-२ अधिकारी राज वडवले व सहाय्यक निरीक्षक लक्ष्मण बारगजे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.मुख्याध्यापक विठ्ठल कचरे यांच्या नेतृत्वाखाली मार्गदर्शक शिक्षक सुजाता पवार, विजय जाधव, मीनाक्षी प्रधान, सुधाकर शिंदे, किशोर कांबळे, विनोद वखरे, संतोष सांगळे, सुरेखा पवळ आणि इक्बाल शेख यांच्या अथक परिश्रमांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

आमच्या शाळेतील बहुतांश विद्यार्थी हे ऊसतोड कामगार, कष्टकरी आणि सामाजिकदृष्ट्या वंचित घटकांतील आहेत. कौटुंबिक अन् आर्थिक अडचणींवर मात करत या मुलांनी दिवस-रात्र घेतलेले परिश्रम आणि आमच्या शिक्षकवृंदाचे नियोजनबद्ध मार्गदर्शन यामुळेच हा ऐतिहासिक निकाल शक्य झाला. योग्य संधी आणि दिशा मिळाली तर ग्रामीण भागातील मुलेही कोणत्याही स्पर्धेत मागे राहत नाहीत, हेच आमच्या ११ विद्यार्थ्यांनी सिद्ध करून दाखवले आहे. या यशाचा आम्हाला सार्थ अभिमान आहे.

– विठ्ठल कचरे (मुख्याध्यापक, प्राथमिक आश्रमशाळा वारोळा)

# वैयक्तिक योजनांचा लाभ घरपोच मिळवून देणार -धनंजय मुंडे

## बचत गट, घरकुले आणि पांदण रस्ते इत्यादी योजनेत परळी मतदारसंघ जिल्ह्यात पहिल्या स्थानावर येईल, असे काम करू

### छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियानात धनंजय मुंडे यांच्या हस्ते शेकडो लाभार्थ्यांना विविध योजनांच्या लाभांचे वाटप

बीड/परळी । प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराज महाराज समाधान शिबिर अंतर्गत आज विविध शासकीय योजनेतील शेकडो लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभाचे वाटप प्रातिधिनिक स्वरूपात केले जात असले तरी आगामी काळात प्रत्येक लाभार्थ्यांच्या घरपोच योजनांचा लाभ मिळवून दिला जाईल, असे प्रतिपादन परळी मतदारसंघांचे आमदार धनंजय मुंडे यांनी केले आहे.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस तसेच दिवंगत उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजित दादा पवार यांच्या प्रथम जयंतीच्या औचित्याने परळी वैद्यनाथ विधानसभा मतदारसंघातील विविध शासकीय योजनांच्या लाभांचे वितरण करण्यासाठी राज्य सरकारचा उपक्रम असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियानाचे धनंजय मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजन करण्यात आले होते.

जिल्ह्याचा पालकमंत्री म्हणून काम करत असताना बीड जिल्ह्यात २८ हजार पेक्षा अधिक घरकुले एकाच वर्षात देण्याचा व पूर्ण करण्याचा विक्रम आपण केला. त्याचप्रमाणे एकट्या परळी तालुक्यामध्ये २०२४-२५ या एका वर्षामध्ये विविध योजना मिळून सुमारे १४००० घरकुले मंजूर करण्यात आले असून त्यापैकी निम्मे पूर्ण झाले आहेत, असे सांगत महिला बचत गटांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी उमेद अभियान



अंतर्गत सुरू असलेल्या कामाचेही यावेळी धनंजय मुंडे यांनी कौतुक केले.

महिला बचत गटांना आर्थिक पाठबळ, विविध योजनांमधून घरकुलांची उभारणी तसेच पांदण रस्ते बांधण्याच्या कामात परळी मतदारसंघ जिल्ह्यात अग्रेसर असून प्रथम क्रमांकावर आले पाहिजे, असे आवाहन श्री. मुंडे यांनी पुढे बोलताना सहकारी व प्रशासनाला केले.

महाराजस्व अभियानासह स्थानिक प्रशासनाच्या वतीने वैयक्तिक लाभाचे तसेच सार्वजनिक कामांचे काम गतीने करण्यात येत असल्याचा आवर्जून उल्लेख करत धनंजय मुंडे यांनी स्थानीं प्रशासनाचे कौतुक केले.

यावेळी उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर यांनी प्रास्ताविक करून वितरीत करण्यात येत असलेल्या लाभांची माहिती सादर केली तसेच परळीच्या नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी तसेच अपर जिल्हाधिकारी श्रीमती अश्विनी सोनवणे - जिरंगे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. व्यासपीठावर माजी आ. संजय दौंड, नगराध्यक्षा सौ. पद्मश्री धर्माधिकारी, अपर जिल्हाधिकारी श्रीमती अश्विनी सोनवणे, उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, उपविभागीय पोलीस अधिकारी ऋषिकेश शिंदे, गोविंदराव देशमुख, बाजीराव धर्माधिकारी, राजाभाऊ औताडे, वैजनाथराव सोळंके यांसह प्रशासनातील विविध विभागाचे अधिकारी - कर्मचारी तसेच पदाधिकारी आदी उपस्थित होते.

# घरफोडी करणारा आरोपी अवघ्या ४८ तासांच्या आत जेरबंद!

## स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई; ३,४४,००० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत

बीड । प्रतिनिधी

पोलीस स्टेशन केज हद्दीत घडलेल्या घरफोडीच्या गुन्ह्यातील कुख्यात आरोपीला स्थानिक गुन्हे शाखा, बीडच्या पथकाने अवघ्या ४८ तासांच्या आत जेरबंद करण्यात यश मिळवले आहे. पोलीस स्टेशन केज येथे गु.र.नं. ४८१/२०२६ कलम ३३१(४), ३०५ (अ) भारतीय न्याय संहितेप्रमाणे (इछड) घरफोडीचा गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांच्याकडून केला जात होता. दरम्यान, दिनांक २९/०७/२०२६ रोजी पोलीस उपनिरीक्षक महेश



विघ्ने यांचे पथक केज हद्दीत आरोपीचा शोध घेत असताना, पथकाला मिळालेल्या गोपनिय माहितीच्या आधारे सदरचा गुन्हा ऋषिकेश दिलीप काळे (रा. फुलेनगर,

# राक्षसभुवन वाळू घोटाळा ; सरकार च्या आशीर्वादाने मुख्य सूत्रधार तहसीलदार खोमणे मोकाट, कारवाईचा बडगा मात्र इतरांवर!

## तहसीलदार खोमणे यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी; तपास भरकटवल्याचा गोदावरी बचाव सर्वपक्षीय कृती समितीचा आरोप

गेवराई । प्रतिनिधी

राक्षसभुवन येथील घरकुल वाळू घोटाळा प्रकरणात खऱ्या सूत्रधारांवर कारवाई करण्याऐवजी इतरांवरच कारवाईचा बडगा उगारण्यात आल्याचा गंभीर आरोप करत गोदावरी बचाव सर्वपक्षीय कृती समितीने पोलीस अधीक्षकांकडे सविस्तर निवेदन सादर केले आहे. या निवेदनातून तत्कालीन तहसीलदार संदीप खोमणे हेच संपूर्ण वाळू घोटाळ्याचे मुख्य सूत्रधार असताना देखील, राजकीय वरदहस्तामुळे त्यांना अद्यापही कायद्याच्या कक्षेबाहेर ठेवण्यात येत असल्याचा आरोप करण्यात आला असून खोमणे यांच्यावर गुन्हा दाखल करावा, अशी मागणी पोलिस अधिक्षक यांच्याकडे करण्यात आली आहे.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, चकलांबा पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ०१९९/२०२६ दाखल असूनही तपासाची दिशा जाणीवपूर्वक बदलली जात आहे. प्रकरणातील काही आरोपींवर कारवाई करून तपास पूर्ण झाल्याचे चित्र निर्माण केले जात असले, तरी या संपूर्ण घोटाळ्याचे कथित मुख्य सूत्रधार असलेल्या तत्कालीन तहसीलदारांवर अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. प्रशासन मधील सर्वाना तसेच राक्षसभुवन मधील लहान पासून मोठ्या पर्यंत सगळ्यांना हा अवैध वाळू उपसा तहसीलदार यांनीच केला हे पहिल्याने सर्वसामान्यांमध्ये नाराजी असल्याची भावना निवेदनात व्यक्त केली आहे तसेच स्वतः तहसीलदार यांनी आदेश देऊन हा अवैध उपसा रोकण्याचा प्रयत्न करणाऱ्या अनुसूचित जातीतील संपूर्ण कुटुंब वर सरकारी कामात अडथळा चा गंभीर गुन्हा दाखल केला असे अनेक प्रकार त्यांनी राक्षसभुवन येथे केले आहेत तेव्हा तहसीलदार खोमणे यांना या गुन्ह्यात तात्काळ मुख्य आरोपी करून त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच या प्रकरणातील सर्व आरोपी आणि तहसीलदार आणी एस डि एम यांचे कॉल डिटेल्स रेकॉर्ड तपासण्यात यावेत, डम डाटा काढण्यात यावा त्यातून आर्थिक व्यवहार, परस्पर संपर्क आणि संपूर्ण रॅकेटचे धागेदोरे समोर येतील, असा दावा समितीने केला आहे.

याशिवाय, गोदावरी नदीपात्रात स्वतः उपस्थित राहून बेकायदेशीर वाळू वाटप केल्याचे कथित व्हिडिओ सोशल मीडियावर उपलब्ध असल्याचा उल्लेख निवेदनात करण्यात आला असून, हे व्हिडिओ तपासाचा भाग करून त्याची शास्त्रशुद्ध पडताळणी करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच जिल्हाधिकाऱ्यांनी तहसीलदारांच्या निलंबनासंदर्भात वरिष्ठांकडे पाठविलेल्या अहवालाचाही दाखला देखील यावेळी दिला आहे. संबंधित ◀◀ पान ३ वर

# निपाणी टाकळी येथील उपसरपंच पद अखेर बरखास्त

## लक्ष्मण चव्हाणांवरील अविश्वास ठराव जिल्हाधिकाऱ्यांकडून कायम

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील मौजे निपाणी टाकळी येथील ग्रामपंचायतीचे उपसरपंच लक्ष्मण सर्जेराव चव्हाण यांच्याविरुद्ध सर्वपक्षीय सदस्यांनी आणलेला अविश्वास ठराव जिल्हाधिकारी, बीड यांनी वैध ठरवत कायम ठेवला आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या या निर्णयामुळे उपसरपंच लक्ष्मण चव्हाण यांचे पद अखेर बरखास्त झाले असून गावाच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

निपाणी टाकळी ग्रामपंचायतीचे उपसरपंच लक्ष्मण चव्हाण हे पदाचा व अधिकाराचा गैरवापर करत असल्याचा आरोप सदस्यांनी केला होता.गावातील मूलभूत समस्या जसे की स्वच्छता आणि पिण्याच्या पाण्याच्या सोयी सुविधांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणे, ग्रामपंचायतीच्या अधिकृत ठरावांची अंमलबजावणी न करणे,इतर सदस्यांना विश्वासात न घेणे आणि त्यांच्यावर गुन्हेगारी स्वरूपाचे गंभीर गुन्हे दाखल असणे (माजलगाव ग्रामीण पो.स्टे. व दिंद्रूड पो.स्टे.) या कारणांमुळे सरपंच व बहुसंख्य सदस्यांचा त्यांच्यावरील विश्वास उडाला होता.या सर्व गंभीर बाबींची दखल घेत सरपंच श्रीमती.उषा भगवान राठोड व इतर सदस्यांनी तहसीलदार माजलगाव यांच्यासमोर अविश्वास प्रस्ताव मांडला होता. तहसीलदारांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या विशेष सभेत १० पैकी ८ सदस्यांनी ठरावाच्या बाजूने कौल दिल्याने उपसरपंचांवरील अविश्वास ठराव बहुमताने पारित झाला होता.तहसीलदारांच्या आदेशाला आव्हान देत लक्ष्मण चव्हाण यांनी जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे कलम ३५ (३-ब) अन्वये अपील अर्ज दाखल करीत अविश्वास ठरावाची प्रक्रिया बेकायदेशीर असून कायदेशीर नियमांचे उल्लंघन झाल्याचा दावा करण्यात आला होता.या प्रकरणांत उत्तरवादी गैरअर्जदार (सरपंच व सदस्य) यांच्या बाजूने विधीज्ञ ॲड. अर्जुन बी.आडे (माजलगाव) यांनी जिल्हाधिकाऱ्यांसमोर अत्यंत प्रभावी व सक्षम युक्तिवाद केला आणि कायदेशीर बाजू समोर आणली व त्यांना या प्रकरणांत बीड येथील विधीज्ञ ॲड. कपिलकुमार व्ही. बेदरे यांनी विशेष सहकार्य केले.



पिंपळवंडी:-आषाढी एकादशीला श्री. अश्वत्थलिंग भजनी मंडळ पायी दिंडीस ग्रा.पं.कर्मचारी बाबुराव शिंदे यांनी फराळ वाटप केला. यावेळी मा.उपसरपंच विलास पटवा,चंदूकाका कुलकर्णी,सुनील पवार,तुकाराम शिंदे (मामा),आदर्श गाव कृती समिती सदस्या समृद्धी पटवा व गांवकरी.

# गोर गरीब जनतेसाठी येणारे राशन निकृष्ट दर्जाचे, जनावरेही खाणार नाहीत असे राशन दुकानात


## जिल्हाधिकारी व तहसीलदारांचे दुर्लक्ष

पात्रुड । प्रतिनिधी

केंद्र व राज्य शासनाकडून गरीब व गरजू नागरिकांसाठी अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत धान्य उपलब्ध करून दिले जाते परंतु प्रत्यक्षात अति निकृष्ट दर्जाचे धान्य असल्याने शासनाच्या योजनेला व उद्देशालाच हरताळ फासला जात आहे.

माजलगाव तालुक्यात महसूल व अन्नपुरवठा विभागा मार्फत रेशन वितरण प्रणाली अंतर्गत गोरगरीब आणि गरजू





नागरिकांना धन्य वितरित केले जाते मात्र हे वितरित केले जाणारे धान्य हे अति निकृष्ट दर्जाचे असून गहू व तांदळामध्ये कीड तसेच तुटलेले तांदूळ व दुर्गंधीयुक्त खराब धान्य लाभार्थ्यांना मिळत असल्याने लाभार्थ्यांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. लाभार्थ्यांना मिळणाऱ्या गहू व तांदळाची गुणवत्ता अत्यंत खराब प्रतीची असून हे धान्य जनावरे देखील खाणार नाहीत मग आम्ही माणसांनी कसे खावे असा संतप्त सवाल नागरिकांतून व्यक्त होत आहे.

या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित जिल्हा पुरवठा ◀◀ पान ३ वर

### खासदार आमदार तुपाशी जनता उपाशी


विद्यमान खासदार व आमदार साहेब गोरगरिबांना मिळणारे रेशन (धान्य) कोणत्या गुणवत्तेचे, प्रतीचे आहे व कसे आहे हे एकदा लाभार्थ्यांच्या घरी येऊन बघावे व खावे! तेव्हाच आपल्याला केंद्र सरकारचा व राज्य सरकारच्या अन्नसुरक्षा योजनेचा बोजबारा झालेला दिसून येईल गोरगरीब जनतेच्या व्यथा आपणास काय कळणार, म्हणूनच याला म्हणतात खासदार आमदार तुपाशी व जनता उपाशी असे समस्त लाभार्थ्यातून बोलले जात आहे.

# पाटोदा बसस्थानक परिसरात अस्वच्छतेचे साम्राज्य ; प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील बसस्थानक परिसरात अस्वच्छता, वाढलेले गवत, पडून असलेले बांधकाम साहित्य आणि अपूर्ण अवस्थेतील कामांमुळे प्रवाशांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. पावसाळ्यामुळे परिसरात चिखल व पाणी साचत असल्याने प्रवाशांची ये-जा धोकादायक बनली आहे.

बसस्थानकाच्या आवारात काही ठिकाणी सिमेंटचे पाइप, विटा आणि इतर बांधकाम साहित्य अनेक दिवसांपासून पडून



असल्याचे दिसून येते. तसेच वाढलेले गवत आणि जीर्ण झालेले कुंपण यामुळे परिसराची शोभा तर कमी झालीच आहे, शिवाय अपघाताचा धोका देखील वाढला आहे.

दररोज शेकडो प्रवासी या बसस्थानकातून प्रवास करतात. मात्र मूलभूत सुविधांच्या देखभालीकडे संबंधित यंत्रणेचे दुर्लक्ष होत असल्याची भावना नागरिक आणि प्रवाशांमध्ये व्यक्त होत आहे. बसस्थानक परिसराची तातडीने स्वच्छता करून अपूर्ण कामे पूर्ण करावीत, पडून असलेले साहित्य हटवावे आणि प्रवाशांसाठी सुरक्षित व स्वच्छ वातावरण निर्माण करावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# भारतीय ज्ञानपरंपरेचे मूल्य जपत शिक्षणाची वाटचाल व्हावी

## कुलगुरू प्रा.डॉ.विजय फुलारी यांचे प्रतिपादन; बीडमध्ये सौ.के.एस.के. महाविद्यालयात 'गुरुवंदन २०२६' राष्ट्रीय कार्यशाळेचे उद्घाटन

बीड । प्रतिनिधी

'गुरुवंदन' राष्ट्रीय कार्यशाळेतून शिक्षणासंबंधी मंथन होणे गरजेचे आहे. प्रत्येक प्राध्यापकाने आत्मपरीक्षण करावे आणि विद्यार्थ्यांनीही आपल्या कर्तव्याची जाणीव ठेवावी. भारतीय ज्ञानपरंपरा अत्यंत उत्तुंग असून आत्मभान व आत्मचिंतन जपावे. आपल्या ज्ञानपरंपरेची मूल्ये जपत शिक्षणाची वाटचाल व्हावी, असे प्रतिपादन डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ.विजय फुलारी यांनी केले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, बीड येथील सौ.के.एस.के. महाविद्यालय आणि विद्यापीठ विकास मंच यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'भारतीय ज्ञानपरंपरा, गुरुशक्ती २०४७ -विकसित




भारत : शैक्षणिक नेतृत्वातून राष्ट्रनिर्माण' या विषयावरील 'गुरुवंदन २०२६' राष्ट्रीय कार्यशाळेच्या पहिल्या सत्राचे उद्घाटन बुधवारी (दि.२९) पार पडले. यावेळी उदघाटक म्हणून प्रा.डॉ.फुलारी हे बोलत होते.

व्यासपीठावर स्वागताध्यक्ष तथा नवगण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ.योगेश क्षीरसागर, शिक्षा संस्कृती उत्थान न्यासचे राष्ट्रीय उपाध्यक्ष संजय स्वामी, विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ.गजानन सानप, निमंत्रक विद्यापीठ विकास मंचाचे प्रा.डॉ.सर्जेराव जिगे, विद्यापीठ विकास मंचाचे सचिव परमेश्वर हसबे, आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभागाचे संचालक प्रा.डॉ.अश्विन रांजणीकर, नवगण शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ.सुधाकर गुट्टे, डॉ.विश्वंभर देशमाने आदींची उपस्थिती होती.

पुढे बोलताना प्रा.डॉ.फुलारी म्हणाले, भारतीय ज्ञानपरंपरा ही प्राचीन काळापासून समृद्ध आहे. मात्र आज शिक्षणाबाबतची संवेदनशीलता कमी होत चालली आहे. शिक्षकांनी वर्गात जाण्यापूर्वी विषयाचा सखोल अभ्यास करावा आणि विद्यार्थ्यांनी ज्ञान आत्मसात करण्यासाठी नियमित उपस्थित राहावे. महाविद्यालयातील प्रत्येक प्राध्यापकाचे आपल्या विषयावर प्रभुत्व असणे आवश्यक आहे, असे मत मांडले. विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ.गजानन सानप यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले. ◀◀ पान ३ वर

# भरधाव वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनाने उडविले ;पिंटू सोनवणे गंभीर जखमी

बीड । प्रतिनिधी

वाळू वाहतूक करणाऱ्या भरधाव वाहनाने तरुणाला जबर धडक दिल्याने अशोक उर्फ पिंटू कोंडीबा सोनवणे हा तरुण गंभीररित्या जखमी झाल्याने बीड येथील एका खाजगी रुग्णालयात असून त्याच्यावर डॉक्टरांनी शर्थीने प्रयत्न केल्याने आता पिंटू सोनवणे याची प्रकृती स्थिर आहे.

यासंदर्भात समजलेली माहिती अशी की, गेवराई तालुक्यातील चकलांबा येथील सावता माळी चौक ते सार्वजनिक स्मशानभूमी या रस्त्यावर नदीजवळ वाळू वाहतूक



करणाऱ्या बाळू खेडकर या वाहन चालकाने भरधाव वेगात वाहन चालवून पिंटू उर्फ अशोक सोनवणे याला जबर धडक दिली. सदर घटना २० जुलै रोजी सायंकाळी सात वाजता घडली.या घटनेत सोनवणे यांचा उजवा पाय निकामी झाला आहे. तर हाताला आणि खांद्यालाही जबर फॅक्चर झाले आहे. सदर गंभीर रुग्णावर बीड येथील लोटस हॉस्पिटलमध्ये डॉ. आशिष गर्जे आणि डॉ. काळे हे यांच्या मार्गदर्शनाखाली उपचार सुरू आहेत. अत्यावस्थ अवस्थेतील पिंटू सोनवणे आता यांची प्रकृती धोक्याबाहेर असून त्यांच्या पायावर मोठी शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.दरम्यान या प्रकरणी चकलांबा पोलीस ठाण्यात संबंधित वाहनधारक विरुद्ध तक्रार करण्यात आली आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांचे सहकारी पोलिस करीत आहेत.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26